सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. १६ नोव्हेंबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक २२० | पाने : ८ | किंमत रु. ६/-


## थोडक्यात...

### ट्रम्प यांनी कॉफी, मांस आणि इतर मूलभूत अन्नपदार्थांवरील शुल्क उठवले



वॉशिंग्टन, १४ नोव्हेंबर : किराणा मालाच्या किमतींबद्दल अमेरिकन ग्राहकांमध्ये वाढती असंतोषामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २०० हून अधिक मूलभूत अन्नपदार्थांवरील आयात शुल्क उठवले आहे. ज्यामध्ये कॉफी, मांस, केळी आणि संत्र्याचा रस यासारख्या मुख्य उत्पादनांचा समावेश आहे. नवीन सवलती आता लागू झाल्या. ट्रम्प यांनी दावा केला आहे की, या वर्षाच्या सुरुवातीला लादलेले आयात शुल्क देशात महागाईला चालना देत नाहीत.एअर फोर्स वनमध्ये पत्रकारांनी या निर्णयाबद्दल विचारले असता ट्रम्प यांनी ही घोषणा केली. त्यांनी मान्य केले की, काही प्रकरणांमध्ये किमती वाढल्या आहेत. पण एकूणच, अमेरिकेत प्रत्यक्षात महागाई नाही.

### बिहारमध्ये शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू

पाटणा, १५ नोव्हेंबर : बिहारमधील मुझफ्फरपूर येथे काल रात्री उशिरा शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातील पाच जण जिवंत जळाले. इतर पाच जण गंभीर भाजले असून त्यांना वैद्यकीय महाविद्यालयात नेण्यात आले आहे. पश्चिम विभागाच्या पोलीस उपअधीक्षक सुचित्रा कुमारी यांनी पाच जणांच्या मृत्यूची पुष्टी केली. कुटुंबातील सदस्यांना पळून जाता आले नाही त्या मुळे त्यांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन मुले, त्यांचे पालक आणि आणखी एका सदस्याचा समावेश आहे.घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि पोलिस घटनास्थळी पोहोचले, परंतु तोपर्यंत आगीने घराला वेढले होते. स्थानिक रहिवाशांच्या मदतीने आग आटोक्यात आणण्यात आली गेली. जखमींना तात्काळ वैद्यकीय महाविद्यालयात पाठवण्यात आले.पश्चिम विभागाच्या पोलीस उपअधीक्षकांनी सांगितले की, प्रथमदर्शनी शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचे दिसून येत आहे. फॉरेन्सिक टीम घटनास्थळी पोहोचली आहे; तपासानंतर नेमके कारण स्पष्ट होईल.

### कोलकात्याच्या बारा बाजार मार्केटमध्ये भीषण आग, अनेक दुकाने जळून खाक



कोलकाता, १५ नोव्हेंबर : कोलकात्याच्या बारा बाजार मार्केटमध्ये शनिवारी सकाळी भीषण आग लागली. एज्रा स्ट्रीटवरील एका इलेक्ट्रिक वस्तूंच्या दुकानात लागलेल्या आगीमुळे संपूर्ण परिसरात घबराट पसरली. आग इतकी भीषण होती की, ती लवकरच जवळच्या इमारती, इतर दुकाने आणि गोदामांमध्ये पसरली. अग्निशमन विभागाच्या म्हणण्यानुसार, शनिवारी पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास आगीची माहिती मिळाली. सुरुवातीला आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या सहा गाड्या आल्या. पण आगीची तीव्रता पाहता, नंतर ही संख्या २१ पर्यंत वाढवण्यात आली. घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान आगीवर नियंत्रण मिळविण्याचा सतत प्रयत्न करत आहेत, जरी दाट लोकवस्ती असलेला परिसर आणि ज्वलनशील पदार्थांच्या मुबलक प्रमाणात असल्याने आगीवर नियंत्रण मिळवणे अत्यंत कठीण होत आहे.

### मुंबई विमानतळावर १७.१८ कोटी रुपयांचे कोकेन जप्त; एकाला अटक



मुंबई, १५ नोव्हेंबर : अमली पदार्थांच्या तस्करीविरोधातील एका सुनियोजित कारवाईत, महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (डीआरआय) मुंबई विभागीय युनिटने, मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर एन्टेबे (युगांडा) येथून आलेल्या एका टांझानियन महिला प्रवाशाकडून १७१८ ग्रॅम कोकेन जप्त केले. या जप्त केलेल्या कोकेनची आंतरराष्ट्रीय बाजारातील अंदाजे किंमत १७.१८ कोटी रुपये आहे. मिळालेल्या विशिष्ट माहितीच्या आधारे, डीआरआय अधिकार्‍यांनी या महिला प्रवाशाला आगमन होताच अडवले. तिच्या सामानाची सखोल तपासणी केली असता, पांढरी पावडर असलेली २ अन्न पाकिटे, पांढरी पावडर असलेला १ प्लास्टिकचा कंटेनर आणि पांढऱ्या पावडरच्या गोळ्या असलेली १ छोटी पिशवी आढळून आली. अधिकार्‍यांनी या प्रवाशाने गिळलेल्या दोन कॅप्सूलदेखील जप्त केल्या.

# दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीवर भारताची मजबूत पकड



कोलकाता, १५ नोव्हेंबर : भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिल्या कसोटी सामन्यावर भारतीय संघाने आपली पकड मजबूत केली आहे. रवींद्र जडेजाच्या फिरकी गोलंदाजांनी सामन्यात टीम इंडियाने यशस्वी पुनरागमन केले आहे. भारताचा पहिला डाव १८९ धावांवर आटोपला होता आणि संघाने ३० धावांची माफक आघाडी मिळवली होती. दुसऱ्या डावात ७ बाद ९३ धावांवर असलेल्या दक्षिण आफ्रिकेने आपली आघाडी ६३ धावांपर्यंत वाढवली आहे. दुसऱ्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा कर्णधार टेम्बा बावुमा २९ धावांवर आणि कोबिन बॉश १ धावांवर नाबाद खेळत होते.

पहिल्या डावात भारताने १८९ धावा केल्या आणि दक्षिण आफ्रिकेवर ३० धावांची आघाडी घेतली. भारतीय कर्णधार शुभमन गिल फलंदाजी करताना जखमी झाला आणि रिटायर्ड हर्ट झाला. तो पुन्हा फलंदाजी करू शकला नाही, परिणामी भारताचा पहिला डाव नऊ विकेट गमावून संपला. दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात १५९ धावा केल्या होत्या. भारताकडून केएल राहुलने सर्वाधिक ३९ धावा केल्या. तर वॉशिंग्टन सुंदरने २९ धावांची खेळी केली. राहुल आणि वॉशिंग्टन यांनी दुसऱ्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी केली. भारताकडून ऋषभ पंतने २७, रवींद्र जडेजा यांनी २७, अक्षर पटेल यांनी १४, ध्रुव जुरेल यांनी १४, यशस्वी जयस्वाल यांनी १२, कुलदीप यादव यांनी १, मोहम्मद सिराज यांनी १ आणि जसप्रीत बुमराह यांनी नाबाद १ धाव केली. गिल चार धावा काढल्यानंतर रिटायर्ड हर्ट झाला. दक्षिण आफ्रिकेकडून सायमन हार्मरने चार, तर मार्को जानसेन यांनी तीन विकेट्स घेतल्या. केशव महाराज आणि कॉर्बिन बॉश यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

पहिल्या डावात भारताला १८९ धावांवर रोखल्यानंतर दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांना भारतीय फिरकी गोलंदाजांविरुद्ध संघर्ष करावा लागला. रविंद्र जडेजाच्या न फिरकी गोलंदाजीपुढे पाहुण्या संघाच्या फलंदाजांना फारशी कमाल करता आली नाही. रविंद्र जडेजाने सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या आहेत. तर कुलदीप यादवने दोन आणि अक्षर पटेलने एक विकेट घेतली.

# काँग्रेसने वर्षानुवर्षे आदिवासींना वाऱ्यावर सोडले : पंतप्रधान मोदी



अहमदाबाद, १५ नोव्हेंबर : आदिवासी समाजाने देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात मोठे योगदान दिले आहे. परंतु, स्वातंत्र्योत्तर काळात तब्बल ६० वर्षे काँग्रेसने आदिवासींची उपेक्षा केली. त्यांना वाऱ्यावर सोडून दिल्याची टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली. बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्ताने गुजरातमध्ये आयोजित जनजातीय गौरव दिवस कार्यक्रमाला संबोधित करताना ते बोलत होते.

पंतप्रधानांनी आपल्या भाषणात आरोप केला की काँग्रेसने आपल्या प्रदीर्घ सत्ताकाळात आदिवासी समाजाकडे दुर्लक्ष केले गेले. त्यांनी सांगितले की सहा दशकांपर्यंत आदिवासी समाजाला त्यांच्या दैनीय अवस्थेतच सोडून देण्यात आले. कुपोषण, शिक्षणाचा अभाव यांसारख्या समस्या तशाच राहिल्या आणि त्या अनेक आदिवासी भागांची ओळख बनून गेल्या आहेत. भाजप सरकारने नेहमी आदिवासी समाजाच्या कल्याणाला प्राधान्य दिले आहे आणि त्यांना सक्षम करण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत असे मोदींनी सांगितले.

या कार्यक्रमानंतर मोदींनी सूरत येथे बांधण्यात येत असलेल्या बुलेट ट्रेन स्टेशनचे निरीक्षण केले. हे स्टेशन मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल कॉरिडोरचा एक भाग आहे, जो देशातील सर्वात महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक आहे. हा कॉरिडोर सुमारे ५०८ किमी लांब असून ३५२ किमी गुजरात आणि दादरा-नगर हवेलीमध्ये, तर १५६ किमी महाराष्ट्रात बांधला जात आहे. यामुळे अहमदाबाद, वडोदरा, सूरत, वापी, विरार, ठाणे आणि मुंबई यांसारखी मोठी शहरे एकमेकांशी जोडली जातील. सध्या ३२६ किमी वायाडक्टचे काम पूर्ण झाले असून २५ पैकी १७ नदीपूल बांधून झाले आहेत. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई-अहमदाबाद प्रवास सुमारे दोन तासांत करता येईल. ही हाय-स्पीड ट्रेन यात्रा अधिक जलद, सोयीची आणि आरामदायक होईल. सोबतच संपूर्ण कॉरिडोरमध्ये व्यापार, पर्यटन आणि आर्थिक उपक्रमांना मोठी चालना मिळेल.

## कंबोडिया आणि थायलंडमध्ये युद्धबंदी राखण्यात यशस्वी : ट्रम्प



वॉशिंग्टन, १५ नोव्हेंबर : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले की, त्यांनी कंबोडिया आणि थायलंडमधील तणाव कमी करून युद्ध रोखले आहे. ट्रम्प म्हणाले की, त्यांनी अमेरिकेच्या मध्यस्थीने केलेला युद्धविराम भंग होण्यापासून रोखला. मी आज युद्ध थांबवले, असे त्यांनी फ्लोरिडा येथील त्यांच्या मार-ए-लागो रिसॉर्टला जाताना एअर फोर्स वनवर माध्यमांना सांगितले.

ट्रम्प म्हणाले की, त्यांनी कंबोडिया आणि थायलंड या दोन्ही देशांच्या पंतप्रधानांशी फोनवरून चर्चा केली. ते म्हणतात की, त्यांच्या कठोर व्यापार उपाययोजनांच्या धोरणामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय दबाव आणण्याची शक्ती मिळाली आणि त्यांनी दोन्ही देशांना संघर्ष थांबवण्यास भाग पाडण्यासाठी त्याचा वापर केला. अमेरिकेने यापूर्वी या सीमा वादात हस्तक्षेप केला आहे. जुलैमध्ये दोन्ही देशांमध्ये पाच दिवस गोळीबार झाला तेव्हा तात्पुरती युद्धबंदी करण्यात आली होती. ज्यामध्ये डझनभर सैनिक आणि नागरिक ठार झाले होते. गेल्या महिन्यात मलेशियामध्ये झालेल्या आसियान शिखर परिषदेदरम्यान ही युद्धबंदी वाढवण्यात आली आणि पुन्हा लागू करण्यात आली.

कंबोडियाचे पंतप्रधान हुन मानेट यांनी सीमेवरील गोळीबारात एक गावकरी ठार झाल्याचे आणि तीन जण जखमी झाल्याचे वृत्त दिल्यानंतर या आठवड्यात पुन्हा तणाव निर्माण झाला. कंबोडियाने आरोप केला आहे की थाई सैन्याने बांतेय मीन्चे प्रांतातील प्री चान गावात नागरिकांवर गोळीबार केला.

## राहुल गांधी व विरोधी नेत्यांकडून करण्यात येणारे आरोप निराधार

### विरोधकांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार पलटवार



नागपूर,१५ नोव्हेंबर : बिहार निवडणुकीतील पराभवानंतर आत्मपरीक्षण न करता सत्ताधारी पक्षावर आरोपांची सरबत्ती करणाऱ्या विरोधकांवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार पलटवार केला. राहुल गांधी व शरद पवारांसह काही विरोधी नेत्यांकडून करण्यात येणारे आरोप निराधार असल्याची टीका त्यांनी केली.

फडणवीस म्हणाले की, निवडणूक हरल्यानंतर हार स्वीकारणे आणि आत्मपरीक्षण करणे आवश्यक असते. परंतु विरोधक हे करण्यात अपयशी ठरत आहेत. ते आत्मपरीक्षण करीत नाहीत तोपर्यंत त्यांची दुर्दशा होत राहील. बिहार निकालानंतर राहुल गांधींनी निवडणूक निष्पक्ष नव्हती असे वक्तव्य केले, तर शरद पवारांनी 'पैसे वाटून निवडणूक जिंकली' असा आरोप केला. त्यावर प्रतिक्रिया देताना फडणवीस म्हणाले की, लोकांच्या मनात आमच्या योजनांना चांगला प्रतिसाद मिळाला, म्हणूनच जनतेने आम्हाला निवडून दिल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

अजित पवार-अमित शहा भेटीविषयी फडणवीस यांनी सांगितले की ती भेट राज्यातील विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी होती. राज्यात वाढत्या बिबट्या दहशतीबाबत लवकरच उच्चस्तरीय बैठक होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकांबाबत त्यांनी सांगितले की, विरोधक एकत्र लढो वा स्वतंत्र, महत्त्वाचे म्हणजे मुंबईच्या जनतेचा महायुतीवरील विश्वास हा निर्णायक घटक आहे. जनतेने महायुतीचा महापौर निवडण्याचा निर्णय घेतल्याचा त्यांनी दावा केला.

## श्रीनगर : नौगाम पोलिस ठाण्यात स्फोट, १० जणांचा मृत्यू



श्रीनगर, १५ नोव्हेंबर : जम्मू-काश्मीरच्या श्रीनगरमधील नौगाम पोलिस ठाण्यात फरीदाबादमधून जप्त केलेल्या अमोनियम नायट्रेटचा शुक्रवारी रात्री भयंकर स्फोट झाला. या स्फोटामुळे पोलिस ठाण्याचा एक भाग कोसळला आणि पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या गाड्यांना आग लागली. या दुर्घटनेत पोलिस निरीक्षकासह १० जणांचा मृत्यू झाला असून २७ जण जखमी झाले आहेत. जैश-ए-मोहम्मदच्या दहशतवाद्यांकडून जप्त केलेल्या अमोनियम नायट्रेटची तपासणी करत असताना हा स्फोट घडल्याचे सांगितले आहे.

फरीदाबादमधून जप्त केलेल्या अमोनियम नायट्रेटचा काही भाग श्रीनगरच्या नौगाम पोलिस ठाण्यात ठेवला होता, आणि त्याच ठिकाणी शुक्रवारी रात्री स्फोट झाला. स्फोट इतका भीषण होता की पोलिस ठाण्याचा एक मोठा भाग कोसळला आणि त्यात पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या वाहने जळून खाक झाली. स्फोटात पोलिस निरीक्षकासह १० जणांचा मृत्यू झाला आहे, तर २७ जण जखमी झाले आहेत. या जखमींमध्ये २४ पोलिस कर्मचारी आहेत. स्फोटाच्या वेळी पोलिस ठाण्याच्या इमारतीत डीएसपी रँकचा एक अधिकारी आणि तहसीलदार यांच्यासह ५० पेक्षा जास्त लोक उपस्थित होते. जखमींपैकी ५ जणांना सैन्याच्या बेस हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून, इतर जखमींना श्रीनगरमधील इतर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी या स्फोटाला दहशतवादी हल्ला मानलेले नाही आणि ते एक अपघात असल्याचे सांगितले आहे.

या स्फोटाचे कारण फरीदाबादमधून पकडले गेलेल्या जैश-ए-मोहम्मद आणि अंसार गजवात-उल-हिंदच्या दहशतवाद्यांच्या गँगकडून जप्त केलेल्या अमोनियम नायट्रेटमध्ये होत असलेली तपासणी असू शकते. स्फोटाच्या वेळी, फॉरेन्सिक टीम आणि पोलिस कर्मचारी अमोनियम नायट्रेट आधारित स्फोटकांच्या नमुन्यांची तपासणी करत होते. फरीदाबादमधून जप्त केलेल्या ३६० किलो अमोनियम नायट्रेटपैकी काही भाग एफएसएल (फॉरेन्सिक सायन्स लॅब) मध्ये ठेवला होता, आणि उर्वरित भाग नौगाम पोलिस ठाण्याच्या माल गोदामात ठेवला होता.

या घटनेनंतर जम्मू-काश्मीर पोलिसांनी सांगितले की, हा स्फोट दुर्घटनास्पद होता आणि त्यात दहशतवाद्यांचा हात नाही. त्यानंतर, स्फोटाच्या आवाजाने जवळपास १४ किलोमीटर दूर श्रीनगरच्या एसएमएचएस रुग्णालयापर्यंत धक्काही पोहचला.

## क्रांती चौकात येथे एनडीए च्या विजयाचा जल्लोष



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी

बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (छऊ-) मिळालेल्या बहुमताच्या पार्श्वभूमीवर आज क्रांती चौक परिसरात भाजप कार्यकर्त्यांनी उत्साहपूर्ण जल्लोष साजरा केला. ढोल-ताशांच्या निनादात, फटाक्यांच्या आतषबाजीत आणि घोषणाबाजीच्या गजरात कार्यकर्त्यांचा उत्साह ओसंडून वाहताना दिसला.

या विजयोत्सवाला मान्यवरांची उपस्थिती लाभली. महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री ना. अतुल सावे, माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड, आमदार सौ. अनुराधा चव्हाण आणि भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य अनिलजी मकरिये यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांनी सभोवतालचा परिसर घोषणांनी दुमदुमवला.

बिहारमधील विजय हा विकासाच्या राजकारणाचा विजय असल्याचे मत अनेक नेत्यांनी व्यक्त केले. यावेळी भाजपा कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महासेलिब्रेशनमध्ये सहभाग नोंदवला.

विजयी जल्लोषामुळे क्रांती चौक परिसर उत्साहाने आणि देशभक्तीच्या घोषणांनी भरून गेला.

## ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना 'महाराष्ट्र भूषण २०२४' पुरस्कार प्रदान



नोएडा, १५ नोव्हेंबर : जगविख्यात शिल्पकार राम सुतार यांना महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'महाराष्ट्र भूषण २०२४' प्रदान करण्यात आल्याने या पुरस्काराची मनोभूमिका अधिक उंचावली आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. उत्तर प्रदेशातील नोएडा येथील राम सुतार यांच्या निवासस्थानी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार, तसेच स्थानिक खासदार डॉ. महेश शर्मा यांच्या उपस्थितीत सोहळा पार पडला. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, देश-विदेशात भव्य शिल्पनिर्मिती करून भारताची ओळख जगभर पोहोचवणारे राम सुतार हे खऱ्या अर्थाने ऋषितुल्य आणि प्रतिभासंपन्न शिल्पकार आहेत.

## गुजरात मध्ये एटीएसकडून खलिस्तानी दहशतवाद्याला अटक

अहमदाबाद, १५ नोव्हेंबर : गुजरात पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) हलोल येथून गुरप्रीत सिंग नामक दहशतवाद्याला अटक केली आहे. गुरप्रीतवर पंजाबमध्ये ग्रेनेड हल्ले आणि शस्त्रांच्या तस्करीचा आरोप आहे. तपासात असे स्पष्ट झाले की या प्रकरणातील मुख्य आरोपी मलेशियात आहेत आणि ते आयएसआयच्या निर्देशानुसार पंजाबमध्ये दहशत पसरवण्याचा प्रयत्नात आहेत.

यासंदर्भात एटीएसने सांगितले की, दहशतवादी गुरप्रीत सिंग उर्फ गोपी बिल्ला याला राज्याच्या पंचमहल जिल्ह्यातील हलोल शहरातून त्याला ताब्यात घेण्यात आले असून यासंबंधीची माहिती पंजाब पोलिसांनी एटीएसला दिली आहे. गुरप्रीत सिंगला पंजाब पोलिसांच्या ताब्यात देण्यात येईल. गुरप्रीतवर पंजाबच्या गुरदासपूर जिल्ह्यात ग्रेनेड स्फोट घडवून आणणे आणि पाकिस्तानस्थित दहशतवादी नेटवर्कला मदत केल्याचे गुन्हे दाखल आहेत. प्राथमिक तपासातून उघड झाले की या प्रकरणातील मुख्य आरोपी मनु अगवान आणि मनींदर बिल्ला सध्या मलेशियात आहेत. ते पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयच्या सूचनेनुसार पंजाबमध्ये दहशत पसरवण्यासाठी लोकांची भरती करत होते. पंजाब तसेच इतर राज्यांतील गर्दीच्या भागात ग्रेनेड हल्ले करून दहशत निर्माण करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते.

पंजाब पोलिसांनी काही दिवसांपूर्वी अटक करण्यात आलेल्या दोन आरोपींना

## राष्ट्रवादी, शिवसेना, भाजपाच्या पदाधिकाऱ्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

### नप निवडणुकीत समीकरणे बदलणार



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१५ नोव्हेंबर - शहरातील राजकारणात मोठी उलथापालथ घडवणारी घडामोड १५ नोव्हेंबर रोजी घडली. राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि भाजपातील अनेक पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी काँग्रेसचा हात धरत पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे नगरपरिषद निवडणुकीपूर्वीचे राजकीय गणित ढवळून निघाले असून काँग्रेसला मोठी बळकटी मिळाली आहे.

माजी आमदार नामदेवराव पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत शिवसेनेचे कट्टर व एकनिष्ठ असलेले माजी उपनगराध्यक्ष डॉ. सदाशिव पाटील यांनी शिवबंधन सोडत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसचे अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष व माजी उपनगराध्यक्ष अहेमद अली यांनीही पक्ष प्रवेश केला.

यासोबतच भाजपाचे अनुसूचित जाती जिल्हा उपाध्यक्ष संदीप उजगारे, माजी नगरसेवक अब्दुल अजीज, सुरेश अनवडे,रऊफ गणी, पिंटू शिरसे, बापू बिरारे, शिवसेना शिंदे गटाचे विभाग प्रमुख प्रकाश काचोळे, ह.भ.प. साध्वी नियती गायकवाड, शाहरुख पठाण, विनोद गजलेश्वर, मीरा बनसोडे आदींसह अनेक कार्यकर्त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

या मोठ्या प्रवेशामुळे शहरातील राजकीय वातावरण तापले असून नगरपरिषद निवडणुकीत काँग्रेसला नवीन ऊर्जा मिळणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

प्रवेश सोहळ्यात नामदेवराव पवार, अहेमद अली, डॉ. सदाशिव पाटील, अब्दुल जावेद, साध्वी नियती गायकवाड आदींनी मनोगत व्यक्त केले. तसेच सचिन पवार, शहराध्यक्ष असद खान, याकुब शेख, सोमनाथ दाभाडे, वंजारे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कॉक्सिटमध्ये शुक्रवारी राष्ट्रीय परिसंवाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ नोव्हेंबर :** येथील रॉयल एज्युकेशन सोसायटीच्या कॉक्सिट महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभागातर्फे शुक्रवारी (दि. २१) राष्ट्रीय पातळीवरील एक दिवसीय सेमिनाराचे आयोजन करण्यात आले आहे.

या सेमिनारमध्ये मूल्यवर्धित जैव उत्पादनांची निर्मिती, कमी किमतीच्या रॉ-मटेरियलपासून बायो-हेल्थ प्रॉडक्ट्सची निर्मिती, उद्योग संशोधनातील नवनवीन प्रवाह तसेच आंतरराष्ट्रीय संशोधन व उच्च शिक्षणातील संधी यांसारख्या विषयांवर चर्चा होणार आहे.

या सेमिनारासाठी देश-विदेशांतील तज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत. त्यात थायलंडच्या हत्याई येथील प्रिन्स ऑफ साँगकोला विद्यापीठाचे प्रोफेसर डॉ. बेंजाकूल व शैक्षणिक संशोधक डॉ. उमेश पाटील, राष्ट्रीय कृषी-अन्न व जैव उत्पादन संस्था मोहाली येथील डॉ. शिवराज निळे, पुण्याच्या नॅशनल केमिकल लॅबोरेटरीचे डॉ. महेश पाटील मार्गदर्शन करणार आहेत.

शुक्रवारी (दि. २१) सकाळी ९ वाजता उद्घाटन होणार आहे. मर्यादित जागांमुळे पूर्वनोंदणी आवश्यक आहे. विद्यार्थी व संशोधकांनी सहभागी होऊन या परिसंवादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थाध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील, प्राचार्य डॉ. विनायक जाधव यांनी यांनी केले आहे.



# भाजपमधील अंतर्गत गटबाजी संपली तरच मिळणार निर्भेळ यश ?

**त.भा. वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर, १५ नोव्हेंबर :** मागच्या काही वर्षात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा बालेकिल्ला अशी असलेली लातूर जिल्ह्याची ओळख आता कालबाह्य झाली आहे. त्यामुळे कधीकाळी काँग्रेसमय असणारा हा जिल्हा आता भाजपमय झाल्याचे दृष्टीपथास येते. आज भाजपमध्ये जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात नेत्यांचे, पदाधिकारी-कार्यकर्त्यांचे मजबूत जाळेही निर्माण झाले आहे. जिल्हा भाजपमध्ये आजमितीस केवळ नेतेच वाढले आहेत असे नसून त्याबरोबरच अंतर्गत गटबाजी, मतभेद-मनभेदही वाढल्याचे सर्वज्ञात आहेच. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षाचे प्राबल्य लक्षणीय आहे. तरीही भाजपमधील अंतर्गत गटबाजी संपली तरच निर्भेळ यश मिळेल. अन्यथा काहीही होऊ शकते, असा मतप्रवाह निष्ठावंत कार्यकर्त्यांतून व्यक्त होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

नुकत्याच जाहीर झालेल्या बिहार विधानसभेच्या निकालाने केवळ लातूर जिल्ह्यातीलच नव्हे तर संपूर्ण राज्यभरातील भाजप नेते आणि पदाधिकाऱ्यांचा उत्साह दुणावला आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या निकालाचीच पुनरावृत्ती बिहारमध्येही झाल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे येणाऱ्या काळात महाराष्ट्राप्रमाणे बिहारच्या निकालांवरही संदेह व्यक्त केला गेल्यास नवल वाटू नये. मागच्या तीन साडेतीन वर्षांच्या कालखंडानंतर राज्यात आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे पडघम सुरु झाले आहेत. या निवडणुका तीन टप्प्यात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पहिल्या टप्प्यात मुदती संपून गेलेल्या नगर परिषदा, नगर पंचायतच्या निवडणूक होत आहेत. लातूर जिल्ह्यातील अहमदपूर, औसा, निलंगा, उदगीर या नगर परिषदांच्या तर शिरूर अनंतपाळ व रेणापूर नगर पंचायतच्या निवडणुका होत आहेत. या निवडणुकांसाठी भारतीय जनता पार्टीने जिल्हा निवडणूक प्रमुख म्हणून आ. अभिमन्यू पवार, लातूर शहर निवडणूक प्रमुख म्हणून डॉ. सौ. अर्चनाताई शैलेश पाटील चाकूरकर यांची तर जिल्हा निवडणूक प्रभारी म्हणून माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांची नेमणूक केली आहे. या नेत्यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली स्थानिक स्वराज्यच्या जिल्ह्यातील निवडणुका पार पाडल्या जाणार आहेत.

भाजपच्या जिल्ह्यातील नेत्यांत कोणाचे, कोणाशी किती सख्य आहे, हे चाणाक्ष मतदारांना स्पष्ट शब्दात सांगण्याची आवश्यकता नाही. जिल्ह्यातील भाजपच्या कोणत्या नेत्यांतून विस्तवही जात नाही, ही बाब भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनाही चांगलीच ज्ञात आहे. त्यामुळेच जिल्ह्यातील ही अंतर्गत गटबाजी संपविण्याच्या दृष्टीनेच निवडणूक प्रमुख आणि प्रभारींच्या नेमणुका करण्यात आल्याची चर्चाही जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात चालू आहे.

जिल्ह्यात काही नेते परस्परांवर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात आपलेही आणि पक्षाचेही नुकसान करुन घेत असलेले पाहायला मिळाले आहे. कोणी कितीही नाही म्हटले तरी लातूर शहर विधानसभा मतदार संघातून भाजपच्या उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील यांचा पराभव अंतर्गत गटबाजीच्या कारणावरुनच झाल्याची चर्चा आजही लातूरच्या राजकारणात चवीने केली जाते. त्यामागच्या कारणांचा शोध घेतल्यास त्यातील बारकावे राजकीय विश्लेषकांच्या दृष्टीपथास येऊ शकतात. किमान अशी वेळ भविष्यात पार पडणाऱ्या कोणत्याही निवडणुकीत येणार नाही, याची दक्षता घेण्यासाठीच प्रदेश भाजपने निवडणूक प्रमुख आणि प्रभारींचा पर्याय निवडल्याचे सांगण्यात येते. त्याची सुरुवात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपासून करण्यात आली आहे. आज लातूर जिल्ह्यात भाजपची ताकद एवढी आहे की, प्रमुख नेत्यांनी ठरविल्यास ते काहीही करु शकतात. फक्त संबंधितांनी केवळ आपले हितसंबंध न पाहता प्रामाणिकपणे पक्षासाठी कार्य करण्याचा निर्धार केल्यास ते सहज शक्य आहे. काही नेत्यांचे स्वपक्षातील नेत्यांपेक्षा अन्य पक्षातील नेत्यांशी निकटचे संबंध असल्याचेही दृष्टीपथास येते. अन्य पक्षातील नेत्यांसोबत त्यांनी जरूर निकटचे संबंध ठेवावेत.पण, निवडणुकीपुरते तरी आपल्या पक्षाशी, पक्षाच्या विचारांशी प्रामाणिक राहावे, अशा अपेक्षा निष्ठावंत भाजप पदाधिकाऱ्यांतून व्यक्त होताना पाहायला मिळतात. म्हणूनच भाजपमधील अंतर्गत गटबाजी संपली तरच पक्षाला निर्भेळ यश मिळू शकते, असा मतप्रवाह जिल्ह्यात वाढीस लागला आहे.

## बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त 'जनजातीय गौरव' दिवस



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ नोव्हेंबर :** भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात जिल्हास्तरीय जनजातीय गौरव दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार संतोष बनकर होते. लातूर जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त विस्तार अधिकारी राजाराम आत्राम, गृहपाल विनायक बिरादार, पांडुरंग नागरगोजे, श्रीमती उर्मिला गव्हाणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आदिवासी विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेवून आपल्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या प्रगतीसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन तहसीलदार श्री. बनकर यांनी केले. सेवानिवृत्त विस्तार अधिकारी श्री. आत्राम यांनी क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमात आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थिनींनी आदिवासी लोकनृत्य व लोकगीतांचे सादरीकरण केले. शासकीय सेवेत दाखल झालेल्या वसतिगृहातील माजी विद्यार्थ्यांचा, पालकांसह यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक पांडुरंग नागरगोजे, गृहपाल यांनी, विनायक बिरादार यांनी उपस्थितांचे आभार मानले. सूत्रसंचालन कु. माधवी कोटमाळे व कु. शिल्पा शिंदे यांनी केले. कार्यक्रमास आदिवासी मुलांचे व मुलींचे वसतिगृह येथील कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



## श्री केशवराज विद्यालयात बिरसा मुंडा जयंती उत्साहात साजरी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ नोव्हेंबर :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि.१५ नोव्हेंबर २०२५ शनिवार रोजी स्वातंत्र्य सेनानी, आदिवासी समाजाचे जननायक भगवान बिरसा मुंडा यांची जयंती तसेच भगवान बिरसा मुंडा जनजाती गौरव पंधरवडा उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता व बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

याप्रसंगी मंचावर विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, पर्यवेक्षक धनंजय कुलकर्णी, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, परिपाठ प्रमुख लता कुलकर्णी, ज्ञानोपासक मंडळ प्रमुख श्रीमती तेजस्विनी सांजेकर, कार्यक्रम प्रमुख श्रीमती प्रज्ञा नाईक यांची उपस्थिती होती.

यावेळी कार्यक्रमात विद्यार्थिनींनी क्रांतिकारक बिरसा मुंडा यांच्या तेजस्वी जीवनचरित्रावर आधारित विविध कलाकृती आणि माहिती सादर करून त्यांच्या योगदानाला आदरांजली वाहिली. इयत्ता आठवी 'अ' वर्गातील विद्यार्थिनी कु. माहेश्वरी मेघराज पाटील हिने भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवन चरित्रावर आधारित विषय मांडणी केली. तिने बिरसा मुंडा यांचे स्वातंत्र्यलढ्यातील कार्य, आदिवासी समाजासाठी दिलेले योगदान आणि त्यांचे धरती आबा हे स्वरूप उपस्थितांना समजावून सांगितले.

तसेच कु. मैथिली साधू जाधव या विद्यार्थिनीने बिरसा मुंडा यांच्या जीवनचरित्रावर आधारित एक आकर्षक आणि माहितीपूर्ण भित्तिपत्रक तयार केले. या भित्तीपत्रकात त्यांच्या कार्याचा आणि संघर्षाचा प्रवास उतरवण्यात आला होता. तसेच कु. सायली दत्ता सुडके या विद्यार्थिनीने बिरसा मुंडा यांचे सुंदर आणि बोलके चित्र रेखाटून आपल्या कलागुणांचे दर्शन घडवले.

याप्रसंगी मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी बिरसा मुंडा यांचा जीवनपरिचय व त्यांचे कार्य विद्यार्थ्यांना सांगितले. ज्ञानोपासक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या या शासकीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रज्ञा नाईक यांनी केले. यावेळी विद्यालयातील आठवी ते दहावी विभागातील विद्यार्थी आणि शिक्षकांची उपस्थिती होती.

## सहकारी पतसंस्था संघाच्या वतीने सहकार मंत्री पाटील यांचा सत्कार



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ नोव्हेंबर :** लातूर येथे सहकार भवन मंजूर केल्याबद्दल राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा शनिवारी लातूर जिल्हा सहकारी पतसंस्था संघाच्या वतीने हृद्य सत्कार करण्यात आला.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पतसंस्था संघाचे अध्यक्ष व जिल्हा बँकेचे संचालक अशोक गोविंदपुरकर यांनी राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडे लातूर शहरातील डालडा फॅक्टरीच्या रिकाम्या जागेत सहकार भवनची इमारत बांधण्याची मागणी केली होती. ती मागणी सहकार मंत्र्यांनी त्याच वार्षिक सभेत मान्य केली.

एवढेच नव्हे तात्काळ पुढील मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठवाड्यातील या दुसऱ्या सहकार भवनासाठी ३२ कोटीचा निधीही मंजूर करून दिला. त्याबद्दल सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा शिरूर ताजबंद या ठिकाणी जाऊन जिल्हा पतसंस्था संघाचे वतीने सत्कार करुन त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी जिल्हा सहकारी पतसंस्थेच्या वतीने सहकार मंत्री पाटील यांच्याकडे इमारतीमध्ये सहकार न्यायालयासाठी सुद्धा जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली. जेणेकरून सर्व सहकाराची कार्यालय एका छताखालीच असतील. त्याचा जनतेस फायदा होईल अशी मागणी केली.

या सत्कार प्रसंगी पतसंस्था संघाचे अध्यक्ष अशोक गोविंदपुरकर यांच्यासह उपाध्यक्ष मंचकराव पाटील, सचिव ॲड. शिवराज सुगरे, संचालक सर्वश्री बाबुराव सोमवंशी, धोंडीबा वंगाटे, शिवाजी कांबळे, रमेश बिराजदार, जाधव आदी उपस्थित होते. याप्रसंगी उदगीर येथील सर्वपल्ली राधाकृष्णन कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने सहकार मंत्री महोदयांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

## माजी आमदार कव्हेकरांकडून शेख परिवाराचे सांत्वन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ नोव्हेंबर :** जननायक संघटनेच्या लातूर शहर अध्यक्षा साहेराबी शेख यांचे पती व लातूर शहरातील इंडिया नगर भागातील रहिवासी कै. फैय्याज शेख (६५ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना-नातवंडे असा परिवार आहे. या घटनेची माहिती मिळताच भाजपा नेते तथा भाजपा राष्ट्रीय किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी त्यांच्या इंडिया नगर, भागातील निवासस्थानी भेट देऊन शेख परिवाराचे सांत्वन केले.



यावेळी बोलताना माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले की, आम्ही आपल्या दुःखात सहभागी आहोत आपणास या दुःखातून सावरण्याचे बळ मिळो ही ईश्वरचरणी प्रार्थना अशी भावनिक प्रार्थनाही त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.

यावेळी शेख परिवारातील साहेराबी शेख, मुजफर शेख, मजहर शेख, नाहीद मुलानी, समीर मुलानी यांच्यासह शेख परिवारातील सदस्य उपस्थित होते.

## काशिलिंगेश्वर रहिवाशांना असुविधामुळे मानसिक त्रास

### दुसऱ्यांदा कार्यकारी अभियंता यांना निवेदन



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ नोव्हेंबर :** लातूर शहरालगत काशिलिंगेश्वर नगर ग्रामपंचायत हद्दी मधून जाणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक ते हॉटेल दिग्विजयपर्यंत राष्ट्रीय महामार्गावर दोन्ही बाजूस व विशेषतः रेल्वे उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूस सर्व्हिस रोड व नाली काम करणे आणि या महामार्गावरील दुभाजक मध्ये पथदिवे बसवणे बाबत दुसऱ्यांदा कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, लातूर यांना निवेदन देण्यात आले.

याच गंभीर समस्या बाबत दिनांक ९ मे २२ रोजी पहिले निवेदन देण्यात आले होते. आत्तापर्यंत त्या निवेदनातील केवळ एकच मागणी ती म्हणजे अपघात होणाऱ्या ठिकाणी गतिरोधक तयार करणे ही मागणी पुर्ण करण्यात आली आहे, त्यामुळे अपघाताचे प्रमाण पुर्णपणे घटले आहे. परंतु इतर महत्त्वाच्या समस्या जसे की, आपल्या हद्दीतून जाणाऱ्या या राष्ट्रीय महामार्गावर आपल्या ग्रामपंचायतीचा भाग येतो जो की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक ते दिग्विजय हॉटेलपर्यंत आहे. या महामार्गावर दोन्ही बाजूस सर्व्हिस रोड, नाली बांधकाम व दुभाजक मध्ये स्ट्रीट लाईट बसवणे हे अत्यंत महत्त्वाचे व खूप गरजेचे आहे. विशेषतः रेल्वे उड्डाणपूलाच्या आसपास राहणाऱ्या रहिवाशांना या सुविधा नसल्यामुळे प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

सदरील कामे संबंधित विभागाने आत्तापर्यंत पूर्ण करणं खूप गरजेचे होते, परंतु संबंधित विभागाकडून अद्याप कोणतीही कारवाई याबाबत करण्यात आलेली नाही. सदरील निवेदन देताना ॲड. किरण आर.बडे, ॲड. प्रभाकर केदार, महादेव जमादार, विष्णु शिंदे, उदय गोजमगुंडे, बस्वराज खानापुरे, विलास शिंगडे, परमेश्वर माने, रघुनाथ गिरी, दशरथ फड, दादासाहेब मिसाळ, लक्ष्मण बसपुरे, गोविंद दहिफळे, सदानंद गर्जे महाराज, संदीप डोंगरे, सुर्यकांत उडगे, गोविंद भुसनवाड, चित्रानंद कराड, ॲड. योगेश बनसुडे, ॲड. सतिष धायगुडे आदी उपस्थित होते.

## लोकशाही मजबुतीसाठी विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक महत्त्वाची : तहसीलदार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ नोव्हेंबर :** भारत हा लोकशाही प्रधान देश आहे आणि लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी शालेय स्तरावर विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक अत्यंत महत्त्वाची ठरते. या प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना निवडणूक व्यवस्थेची जवळून ओळख होते व त्यांच्यात नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव आणि नागरिकत्वाचे भान विकसित होते, असे मत लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी व्यक्त केले. साने गुरुजी माध्यमिक विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ च्या विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक उपक्रमाच्या समारोप समारंभ प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. पुढे म्हणाले की, साने गुरुजी विद्यालयाने राबवलेला हा आदर्शवत



उपक्रम विद्यार्थ्यांना मतदानाचे स्वरूप, महत्त्व आणि निवड प्रक्रिया जवळून अनुभवण्याची संधी देतो. या उपक्रमांमुळे भविष्यातील जागरूक नागरिक घडतात.

याप्रसंगी माध्यमिक विभागाच्या (नियोजन) शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, सानेगुरुजी शैक्षणिक संकुलाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज माने, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी गोविंद माने, नागोराव कांबळे, उषा राठोड, शाळेचे मुख्यालय इस्माईल शेख, रवी कुलकर्णी आदि उपस्थित होते.

या प्रसंगी उपस्थित शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हणाल्या, विद्यालयाने राबवलेल्या चुनावी पाठशाळा अर्थात विद्यार्थी प्रतिनिधी निवडणुक या उपक्रमात मतदान करणारे सर्व विद्यार्थी हे केवळ शाळेचे विद्यार्थी न राहता, आता आमचे प्रतिनिधी आणि मित्रदेखील झाले आहेत. त्यांची जबाबदारी आता वाढली असून, त्यांनी आपल्या कुटुंबातील सदस्य, नातेवाईक तथा परिसरातील मतदारांना मतदानाचे महत्त्व सांगून मतदानासाठी प्रेरित करून मतदानाचा टक्का वाढवावा जेणेकरून लोकशाही जिवंत राहील.

या विद्यार्थी प्रतिनिधी निवडणुकीमध्ये ९१५ विद्यार्थी मतदाराने आपल्या मतदानाचा हक्क बजावला. ज्यामध्ये १२५ मते घेत चि. ढवळे धैर्यशील बाळासाहेब या विद्यार्थ्याने शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून बाजी मारली तर कुमारी राठोड पुनम अविनाश या विद्यार्थिनीने ११५ व चि. धपाटे विनायक अशोक यांनी १०६ मते घेत अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. या निवडणूक प्रक्रियेत शाळेचे मुख्याध्यापक इस्माईल शेख यांनी निवडणूक निर्णय अधिकारी व विभाग प्रमुख गंगाधर डिगोळे यांनी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक इस्माईल शेख यांनी तर आभार गंगाधर डिगोळे यांनी मानले. सूत्रसंचलन गणेश परळे यांनी केले.

या कार्यक्रमासाठी सहशिक्षक स्मिता कावळे, शशिकांत पवार, कमल काळगापुरे, मीनाक्षी यादव, सचिन माने, हरिदास कोयले, शिवगंगा जगताप, कोमल डोणगावे, सतीश गायकवाड, अमोल पवार, नवनाथ वडवळे, वैभव धोत्रे, सुनंदा पाटील, दयानंद लहाडे, पौर्णिमा बनसोडे यांनी परिश्रम घेतले.

## गणेश कार्तिकेय' मध्ये गणेश आणि कार्तिकेय मोठे होताहेत

सोनी सबवरील 'गाथा शिव परिवार की – गणेश कार्तिकेय' ही पौराणिक मालिका आपल्या दिव्य कथानकाने प्रेक्षकांचे मन काबिज करत आहे. या मालिकेत भगवान शिव (मोहित मलिक), देवी पार्वती (श्रेनु परीख) आणि त्यांची मुलं गणेश (एकांश कथुरिया) आणि कार्तिकेय (सुभान खान) यांच्या फारशा न ऐकलेल्या कथा बघायला मिळत आहेत. या मालिकेत शिव परिवारातील नाते-संबंध, आव्हाने, विजय आणि मानवी भावनांची किनार असलेले त्यांचे दिव्यत्व प्रेक्षक अनुभवत आहेत.

## हार्परकॉलिन्स इंडिया गौर गोपाल दास यांचे नवीन पुस्तक

मुंबई : हार्परकॉलिन्स इंडियाला गौर गोपाल दास यांचे आगामी पुस्तक 'यू कॅन हॅव इट ऑल', डिसेंबर २०२५ मध्ये इंग्रजीत आणि त्यानंतर इतर भारतीय भाषांमध्ये प्रकाशित होणार आहे, हे पुस्तक खरेदी करण्याची घोषणा करताना आनंद होत आहे.आपल्या काळातील सर्वात प्रभावशाली भिक्षू आणि विचारवंतांपैकी एक म्हणून ओळखले जाणारे, गौर गोपाल दास यांनी त्यांच्या पुस्तकांनी, व्याख्यानांनी आणि डिजिटल सामग्रीने जगभरातील लाखो जीवनांना स्पर्श केला आहे.यू कॅन हॅव इट ऑल हे गौर गोपाल दास यांचे आतापर्यंतचे सर्वात वैयक्तिक आणि सखोल काम आहे. या नवीन पुस्तकात, त्यांनी संतुलन, अर्थ आणि अंतर्गत सरेखनासाठी एक ताजेतवाने धाडसी मार्ग रेखाटला आहे – महत्वाकांक्षा आणि पूर्तता एकत्र ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रत्येकासाठी एक परिवर्तनकारी चौकट, कोणताही त्याग न करता.

## एनर्जी सोल्यूशन्सतर्फे'शक्ती ऑन रूफ'

मुंबई : – शक्ती एनर्जी सोल्यूशन्स प्रा. लि. तर्फे आज 'शक्ती ऑन रूफ' या नव्या पिढीच्या सोलार रूफटॉप सिस्टीम्सच्या लाँचची घोषणा करण्यात आली. उत्कृष्ट कार्यक्षमता, टिकाऊपणा आणि स्मार्ट ऊर्जा कार्यक्षमतेसाठी या सिस्टीम डिझाइन करण्यात आल्या आहेत. हे अनावरण म्हणजे भारतातील अक्षय ऊर्जाक्षेत्रातील कंपनीच्या नेतृत्वाला अधिक बळकटी मिळण्याच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. हा उपक्रम एआय-आधारित शाश्वत नवकल्पनांच्या कंपनीच्या दृष्टीकोनाशी सुसंगत आहे.

## 'सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो २०२५'मध्ये चमकदार कामगिरी

छत्रपती संभाजीनगर – सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज त्यांचा राष्ट्रीय शिक्षण उपक्रम 'सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो २०२५'च्या चौथ्या पर्वाच्या विजेत्यांची घोषणा केली. हा उपक्रम तरूण विद्यार्थ्यांना त्यांच्या स्थानिक समुदायांमधील प्रचलित आव्हानांसाठी तंत्रज्ञानाचा वापर करत वास्तविक विश्वातील सोल्यूशन्स निर्माण करण्याचे चॅलेंज देतो.पर्सिविया (बेंगळुरू), नेक्स्टप्ले एआय (औरंगाबाद), पॅरास्पीक (गुरूग्राम) आणि पृथ्वी रक्षक (पलामू) या अव्वल चार विजेत्या टीम्सना इन्क्यूबेशन अनुदानामध्ये १ कोटी रूपये मिळाले, तसेच ते आयआयटी दिल्लीच्या एफआयटीटी लॅब्समध्ये मार्गदर्शनासह त्यांच्या प्रोटोटाइप्सना विकासात्मक वास्तविक विश्वातील सोल्यूशन्समध्ये विकसित करत राहतील.

## तरुणांना रोड सेफ्टीच्या धडे

नाशिक : सुरक्षित रस्ते आणि जबाबदार नागरिक घडवण्याच्या आपल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमध्ये, होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया ने के.बी.एच. स्कूल, श्रीमती सरस्वती गुलाबराव पाटील विद्यालय आणि क्लिफॉर्ड इंटरनॅशनल स्कूल, नाशिक, महाराष्ट्रातील प्रभावी रोड सेफ्टी जागरूकता मोहीम आयोजित केली. या मोहिमेत २३०० हून अधिक सहभागी उपस्थित होते, ज्यांनी सुरक्षित आणि जबाबदार रस्त्यावरील वर्तनाचे महत्व शिकले. ही पुढाकार विशेषतः युवांना रोड सेफ्टीला एकदा शिकण्याची गोष्ट नव्हे, तर रोजच्या आयुष्यातली जबाबदारी म्हणून पाहण्यास प्रोत्साहित करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे.

## मलाबार गोल्ड अँड डायमंड्सची 'हंगर फ्री वर्ल्ड' मोहीम आता जागतिक स्तरावर

नाशिक – मलाबार गोल्ड अँड डायमंड्स, जगातील पाचव्या क्रमांकाची दागिन्यांची रिटेल कंपनी आणि भारतातील सर्वात आघाडीची सामाजिक जबाबदारी जपणारी संस्था, यांनी त्यांच्या प्रमुख 'हंगर फ्री वर्ल्ड' उपक्रमाचा विस्तार इथिओपियापर्यंत केल्याची घोषणा केली आहे. भारतात आणि झांबियामध्ये उल्लेखनीय परिवर्तन घडवल्यानंतर आता हा उपक्रम आफ्रिका खंडातील पुढच्या टप्प्यात प्रवेश करतो.

भारताच्या करुणा, सहकार्य आणि सामूहिक प्रगतीच्या विचारांवर आधारित हा उपक्रम जागतिक स्तरावर भारतीय व्यवसायांच्या प्रभावाचे उत्तम उदाहरण ठरत आहे. भारतात सिद्ध झालेला हा मॉडेल आता उपासमार आणि शैक्षणिक विषमता दूर करण्याच्या जागतिक चळवळीत रूपांतरित होत आहे. मलाबार आपल्या निव्वळ नफ्याच्या ५% रक्कम सातत्याने सामाजिक उपक्रमांसाठी खर्च करते. हे प्रमाण भारतातील अनिवार्य सीएसआर नियमांपेक्षा दुपटीहून अधिक आहे.

## इंडिका ने आपल्या प्रॉडक्ट पोर्टफोलिओचा विस्तार केला

पुणे : भारतात परवडणाऱ्या सुंदरतेला नवीन दिशा देण्यासाठी, इंडिका ईझीदेशातील नंबर १ शँपू हेअर कलर ब्रँड ने दोन नवीन शेड्स – नॅचरल ब्राऊन आणि बर्गंडी, फक्त १० मध्ये लॉन्च केले आहेत. या लॉन्चसह, केविनकेयर ग्राहकांना इनोव्हेटिव्ह पर्सनल केअर सोल्यूशन्स देण्याची पारंपरिक प्रथा सुरू ठेवत आहे. नवीन १० सॅशेजसह, इंडिका ईझी फक्त १० मिनिटांत सॅलून-क्वालिटी हेअर कलर उपलब्ध करून देते, जे आजच्या गतिमान जीवनशैलीसाठी योग्य आहे.या प्रसंगी श्री रजत नंदा, बिझनेस हेड – पर्सनल केअर, केविनकेयर यांनी सांगितले: केविनकेयरमध्ये, आम्ही नेहमी सुंदरता सर्वांसाठी सुलभ बनवण्यावर विश्वास ठेवला आहे. आमच्या नवीन १० इंडिका ईझी शेड्सचा लॉन्च या दृष्टीकोनाचा भाग आहे, जो ग्राहकांना सहज समृद्ध आणि दीर्घकालीन रंगाचा अनुभव देतो. इंडिका अनेक वर्षांपासून या श्रेणीतील अग्रगण्य ब्रँड आहे, आणि आम्ही सर्वोत्तम मूल्य आणि गुणवत्ता देत ही स्थिती मजबूत करत राहतो.

## 'भाजपाजवळ 'मोदीजी'रुपी ऑक्सिजन',

मुंबई, 'आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी हे प्राणवायूसारखे आहेत. त्यामुळे भाजपाजवळ २४ द ७ ऑक्सिजन आहे. कोणी कितीही हायड्रोजन बॉम्ब आणले, तरीही विजय ऑक्सिजनचाच होतो.', असे प्रतिपादन भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी काल शुक्रवारी (१४ नोव्हेंबर) रोजी केले. शुक्रवार (१४ नोव्हेंबर) रोजी बिहार विधानसभा निवडणुकीच्या लागलेल्या निकालात सत्तारुढ राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं दणदणीत यश मिळवलं. त्यानंतर भाजपाकडून मुंबईत विजयोत्सव साजरा करण्यात आला होता. यावेळी रविंद्र चव्हाण यांनी गमछा घालून भाजपप्रणित एनडीएचा विजय साजरा केला. तसेच कार्यकर्त्यांना संबोधित केले.

## 'लक्ष्मी निवास' मालिका लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस

छत्रपती संभाजीनगर – झी टीव्हीवर लवकरच 'लक्ष्मी निवास' ही नवी मालिका प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. लोकप्रिय कलाकार राजेंद्र चावला या मालिकेत 'श्रीनिवास'ची भूमिका साकारणार आहेत. कुटुंबासाठी आयुष्यभर झटणारा, प्रामाणिक आणि जबाबदार असा हा मध्यमवर्गीय कर्ता पुरुष पत्नी लक्ष्मीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी स्वतःची इच्छा सतत बाजूला ठेवतो. मालिका एका साध्या कुटुंबाची कथा मांडते, जिथे प्रेम, त्याग आणि छोट्या मोठ्या स्वप्नांचा धागा जपला जातो. मध्यमवर्गीयांच्या भावविश्वाला स्पर्श करणारी ही कथा प्रत्येक घराशी नातं जोडणारी ठरणार आहे. 'लक्ष्मी निवास' लवकरच फक्त झी टीव्हीवर प्रसारित होणार आहे.



## कमलबाई जाधव यांचे निधन

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१५ कमलबाई नागनाथ जाधव (वय ६४ वर्ष, रा. गंगापुर, ता.गंगापूर) यांचे आज शनिवार रोजी संध्याकाळी साडेचार वाजता निधन झाले त्यांच्या पश्चात दोन मुले,एक मुलगी,नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर उद्या दिनांक १६ रविवार सकाळी दहा वाजता मयुर पार्क निवास स्थाना पासुन अंत्ययात्रा निघेल गंगापुर येथे कायगाव रोड अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे प्रमोद जाधव व डव्हकेट योगेश जाधव यांच्या मातोश्री होत.

# देवगिरी अभियांत्रिकीमध्ये इन्फोसिसिस ड्राईव्हः ४५ विद्यार्थिनींची भव्य निवड

छत्रपती संभाजीनगर- देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयात दि. १३ व १४ नोव्हेंबर २०२५ रोजी इन्फोसिसच्या कॅम्पस ड्राईव्हचे भव्य आयोजन करण्यात आले. महाराष्ट्रातील ४६ अभियांत्रिकी महाविद्यालयांतील (डीबाटू संलग्नित) अंतिम वर्षातील विद्यार्थिनींसाठी ही विशेष निवड प्रक्रिया राबविण्यात आली.

राज्यातील सुमारे १८०० विद्यार्थिनींनी या प्रक्रियेत सहभाग नोंदविला. ऑनलाइन ॲप्टिट्यूड टेस्ट, टेक्निकल इंटरव्ह्यू आणि एचआर मुलाखत अशा तीन टप्प्यांतून पार पडलेल्या या प्रक्रियेत एकूण ४५ विद्यार्थिनींची निवड करण्यात आली. त्यापैकी ११ विद्यार्थिनी या देवगिरी अभियांत्रिकी च्या आहेत. निवड झालेल्या प्रत्येक विद्यार्थिनीला वार्षिक ३.६ लाख रुपये पॅकेज देण्यात येणार आहे. हे यश महिला सक्षमीकरण आणि तांत्रिक क्षेत्रातील स्त्रियांच्या वाढत्या सहभागाचे उत्तम उदाहरण ठरले आहे.

महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुभाष लहाने यांनी सांगितले की इन्फोसिससारख्या नामांकित कंपनीत विद्यार्थिनींची झालेली निवड ही देवगिरी अभियांत्रिकी संस्थेच्या गुणवत्तेचे आणि शैक्षणिक व्यवस्थापनातील उत्कृष्टतेचे द्योतक आहे.

यावेळी उपस्थित सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांनी सांगितले की इन्फोसिस



ही भारतातील अग्रगण्य बहुराष्ट्रीय आयटी कंपनी असून सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, क्लाउड कम्प्यूटिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा नालिटिक्स, डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन व बिझनेस कन्सल्टिंग अशा विविध क्षेत्रांत ती जागतिक पातळीवर सेवा प्रदान करते त्यासाठी तुम्ही सज्ज झाले पाहिजे. त्यांनी निवड झालेल्या विद्यार्थिनींचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करत त्यांच्या उज्ज्वल भवितव्याच्या शुभेच्छा दिल्या. निवड झालेल्या विद्यार्थिनींमध्ये कम्प्युटर सायन्स शाखेतील नेहा बळी, साराह अनम, सलोनी हजारे, शिवानी माचेवाड, सोनल राईकर; आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग शाखेतील वैष्णवी निकम, मृण्मयी कोंडपल्ले, श्रुतिका राऊत; तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखेतील धनश्री शेळके, ऋतुजा शेटे आणि सृष्टी ठोसर यांचा समावेश आहे.

ही निवड प्रक्रिया सुरळीत व यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. दीपक पवार, त्यांची समर्पित टीम, डॉ. सचिन अग्रवाल, तसेच विद्यार्थी स्वयंसेवक यांच्या उत्कृष्ट नियोजनाने मोलाचे योगदान दिले.

निवड झालेल्या विद्यार्थिनींचे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. आ. श्री. प्रकाशदादा सोळुंके, सरचिटणीस मा. आ. श्री. सतीश चव्हाण, उपाध्यक्ष श्री. शेख सलीम शेख अहमद, कोषाध्यक्ष श्री. किरण आवरगावकर, कार्यकारिणी सदस्य श्री. विश्वास येळीकर आणि श्री. प्रदीप चव्हाण, महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुभाष लहाने, अधिष्ठाता डॉ. सचिन बोरसे, डॉ अमेणा अंसारी, विभागप्रमुख डॉ. गजेंद्र गंधे, , डॉ. आरती वाढेकर, डॉ. राजेश औटी, डॉ. शोएब शेख, डॉ. रुपेश रेब्बा, डॉ ऋषिकेश पाखले, श्री. अच्युत भोसले यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले.

# अलिम्को साहित्य सधने वाटप व शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी शिबिरास प्रतिसाद

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१५ नोव्हेंबर

छत्रपती संभाजीनगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांच्या प्रेरणेने शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, उपशिक्षणाधिकारी समग्र शिक्षा गीता तांदडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे,गट समन्वयक सचिन पाटील यांच्या अधिपत्याखाली सोयगाव तालुक्यातील दिव्यांग विद्यार्थी यांच्यासाठी तालुकास्तरीय मुंबई येथून आलेले अलिम्को चे डॉ.हर्ष विश्वकर्मा डॉ.कोमल फळ,डॉ.अक्षय मोरे ह्या तज्ञ मार्गदर्शक यांच्या मार्फत तपासणी करून साहित्य साधने साठी रेफर करण्यात आले, व सन.२०२४-२०२५ मध्ये अलिम्को




साहित्यासाठी पात्र केलेले विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मोठी व्हील चेअर,छोटी व्हील चेअर, कमोड चेअर व श्रवण यंत्र असे साहित्य साधनांचे वाटप करण्यात आले,त्याचबरोबर शालेय तपासणी मध्ये रेफर केलेले विद्यार्थ्यांना शालेय आरोग्य तपासणी टीमचे प्रमुख मेडिकल ऑफिसर डॉ. खलीद जकी,डॉ.रमेश चव्हाण, लेडीज मेडिकल ऑफिसर श्रीम.पठाण अखतरीत,यांनी विद्यार्थ्यांची तपासणी करून त्यांना पुढील वैद्यकीय सेवेसाठी जिल्हास्तरावरील शस्त्रक्रिया व इतर सुविधा चा लाभ घेण्यासाठी रेफर केले.सदरील शिबिरासाठी जिल्हास्तरीय अपंग समावेशित शिक्षणचे विभागाचे जिल्हा समन्वयक गणेश बेडके व अविनाश बावणे यांनी उपस्थित राहून शिबिरासाठी आलेले दिव्यांग विद्यार्थी व त्यांचा पालकांना मार्गदर्शन केले.

सदरील शिबिराच्या यशस्वीतेसाठी सोयगाव तालुक्यातील सर्व केंद्रीय विशेष तज्ञ शिक्षक सुनील बावचे,कैलास लांडगे, जगन्नाथ काकडे,हफीजोद्दीन शेख,प्रतिज्ञा सोनवणे,संगीता पाटील,यांनी विशेष मेहनत घेतली.त्याच बरोबर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोयगाव चे केंद्रीय मुख्याध्यापक किरण पाटील,गटसाधन केंद्राचे कनिष्ठ सहाय्यक सुनील शेटे,दीपक पाटील,आदींनी सहकार्य केले .

सदरील शिबिराचे अध्यक्षस्थान सोयगाव केंद्राचे केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांनी भूषवले तर शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर दिनाजी

# कन्नडमध्ये नृत्याद्वारे विद्यार्थ्यांची मतदार जनजागृती; भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.१५ नोव्हेंबर – २ डिसेंबर रोजी होणाऱ्या नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कन्नड नगरपरिषद प्रशासनातर्फे मतदार जागृतीचे विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून निवडणूक निर्णय अधिकारी एकनाथ बंगाळे यांच्या संकल्पनेतून भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त शहरातील विविध ठिकाणी मतदार जनजागृती करण्यात आली.

या वेळी एकनाथ बंगाळे आणि मुख्याधिकारी रवींद्र लांडे यांनी उपस्थित नागरिकांना २ डिसेंबरला शंभर टक्के मतदान करण्याचे आवाहन केले.

मतदार जागृती उपक्रमात स्वीप पथकातील योगेश पाटील, प्रवीण दाभाडे, प्रतिभा कदम, सोननीस, दिपक सोनवणे, संघर्ष




पगारे, सागर पाटील, बापूसाहेब मोरे, श्रीराम पवार यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित काशिनाथ पाटील जाधव प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थिनींचे सांस्कृतिक सादरीकरण. विद्यार्थिनींनी भगवान बिरसा मुंडा यांच्या स्मृतीस अभिवादन करणाऱ्या आदिवासी गीतावर सादर केलेल्या नृत्याने उपस्थित प्रेक्षकांची दाद मिळवली.

या नृत्यात श्रेया थेटे, अनुष्का शेगडे, प्रतीक्षा जाधव, सायली मालकर, गीतांजली मगर, वेदिका वाघ, राधिका गायकवाड, अनुजा मगर, सौंदर्या थेटे, राणी पवार, मानवी राठोड, मोनाली राठोड, विद्या राठोड, प्रांजल राठोड यांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थिनींना सुनीता दाबके आणि प्रवीण दाभाडे यांचे मार्गदर्शन मिळाले. नगरपरिषद प्रशासनाच्या या उपक्रमाला नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, मतदानात सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहन देणारा हा उपक्रम विशेष ठरत आहे.

# सोयगाव येथे भव्य कार्यक्रम माजी विद्यार्थी संघाची स्थापना

## माजी विद्यार्थी संघ स्थापना अध्यक्ष पदी रवींद्र काळे यांची निवड



तभा. वृत्तसेवा

सोयगाव, दि.१५ नोव्हेंबर

शासन निर्णयानुसार गटविकास अधिकारी शिवाजी यमुलवाड,सोयगाव गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे,सोयगाव केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांच्या मार्गदर्शन व सूचनेनुसार जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,सोयगाव-पूर्वीची जुनी कन्या शाळा येथे माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा अत्यंत उत्साहात पार पडला.

अनेकांनी शाळेबद्दलची कृतज्ञता व्यक्त करत सी.सी.टि. व्ही.कॅमेरे,शैक्षणिक साहित्य व विविध उपयुक्त वस्तूंची भेट दिली यामध्ये सोयगाव तालुका वकील संघाचे अध्यक्ष ड.राजेश भैय्या गिरी यानी शाळेला संगणक तर रविंद्र काळे,अनिल मानकर,विष्णू मापारी यानी शाळेला सी.सी.टी. व्ही कॅमेरे बसविण्यासाठी आर्थिक मदत दिली.शाळेतील शिष्यवृत्ती



परीक्षेमध्ये प्रविण्य मिळविणार्या विद्यार्थ्यांना कृषीभुषण शेतकरी अरूण सोहनी यानी प्रोत्साहन बक्षिस जाहीर केले,तिरुपती पतसंस्थेकडून ही आर्थिक मदत देण्यात आली तसेच प्रमोद रावणे यानी दहा डसबिन व गणेश आगे यांनी एक मोठा डसबिन भेट दिला तर भास्कर चौधरी यानी १९९६ च्या बॅच कडून शाळेला आवश्यक असणारी भेट वस्तू जाहीर केली.

– शासन निर्णयानुसार माजी विद्यार्थी संघाची स्थापना

शासन निर्णयाच्या अनुषंगाने माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली.हा निर्णय वाचून उपस्थितांना समजावून देणे व मार्गदर्शन करणे ही महत्त्वाची जबाबदारी मंगला बोरसे,केंद्रीय मुख्याध्यापक किरण पाटील,रामचंद्र महाकाळ या तिघांनी संयुक्तरीत्या पार पाडली. यावेळी उपस्थित मान्यवर कार्यक्रमाला विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

गटविकास अधिकारी शिवाजी यमुलवाड,केंद्र प्रमुख फिरोज तडवी, सोयगाव वकील तालुका संघाचे अध्यक्ष ड.राजेश भैय्या गिरी,प्रा.अनिल मानकर,ड योगेश पाटील,बाळू बोरसे,रवींद्र काळे मंगेश सोहनी,राजेंद्र काळे,नगरसेवक राजेंद्र दुतोडे,नगरसेवक हर्षल (बंटी)काळे,रवींद्र साखळे,अण्णा वाघ,रवींद्र काटोले,कृषीभूषण शेतकरी अरुण सोहनी,विजय कदम, बाबु शहा,दिलीप चौधरी,राजु कुडके,भास्कर चौधरी, भास्कर कोरडे,विवेक महाजन,अंकुश पगारे,रामेश्वर शिरसाठ,सोयगाव पोलीस स्टेशनचे सादिक तडवी,रामेश्वर शिरसाठ तसेच मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी याची उपस्थिती होती.

माजी विद्यार्थी संघाची नव्याने निवड

अध्यक्ष-रवींद्र पंडित काळे,उपाध्यक्ष-मंगेश सोहनी कार्याध्यक्ष-अनिल मानकर,सहकार्याध्यक्ष-बाबु शहा तुराब शहा तसेच ज्येष्ठ सदस्य-ड राजेश गिरी,ड योगेश पाटील,कृषीभूषण अरुण सोहनी,समाजसेवक बाळू बोरसे, रवींद्र काटोले,अंकुश पगारे,विजय कदम,भास्कर कोरडे, दिलीप चौधरी, योगेश नागपुरे,राजू कुडके,

मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,सुरेखा चौधरी,रामचंद्र महाकाळ,मंगला बोरसे,सविता पाटील,गणेश बाविस्कर, प्रतिभा कोळी,अंकुश काळे,विकार शेख,बी.वाय.बागवान, देसले सर आदी शिक्षकवृंद कार्यक्रमास उपस्थित होते.

# ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल येथे पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती व बालदिन उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १५ नोव्हेंबर – पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूल, बिडकीन येथे आज दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती व बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून शाळेचे संस्थापक अध्यक्ष श्री. सतिश तोतला, मुख्याध्यापिका सौ. सविता तोतला आणि पर्यवेक्षिका सौ. वर्षा चव्हाण उपस्थित होते. त्यांच्या हस्ते पंडित नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या प्रसंगी भाषण करताना संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला व मुख्याध्यापिका सविता तोतला म्हणाले की, १९५० च्या दशकात पं. नेहरूंनी संसदीय लोकशाही, धर्मनिरपेक्षता, विज्ञान व तंत्रज्ञानाचा प्रसार करून आधुनिक भारताच्या घडणीत मोलाचे योगदान दिले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे भारताच्या विकासाला भक्कम पाया मिळाला, असेही त्यांनी सांगितले.

बालदिनानिमित्त शाळेतील अनेक विद्यार्थी रंगीत पोशाखात तर काही विद्यार्थी थोर महापुरुषांचे रूप धारण करून आले होते. विद्यार्थ्यांनी भाषण, नृत्य, नाट्य, फॅन्सी ड्रेस अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे उत्सवाची शोभा वाढवली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्वराज हाडे व कुणाल चव्हाण यांनी प्रशंसनीयरीत्या पार पाडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जयंतीनिमित्त मोहटादेवी विद्यालयात विविध कार्यक्रम संपन्न




बिडकीन दि १५ नोव्हेंबर श्री मोहटादेवी विद्यालय म्हारोळा येथे दि १४ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमानिमित्त वकृत्व स्पर्धा निबंध, वंदे मातरम गीत गायन, विविध कलागुण दर्शन, आधी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमांमध्ये आकांक्षा बोराडे, शारदा वंजारे, भक्ती जाधव, आस्मा शेख, जीविका राठोड, आदी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून नेहरूजींच्या जीवनावर प्रकाश टाकला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख दीपक कर्डिले यांनी केले. कार्यक्रमासाठी आभार म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक महेश घोरतळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी सुभाष गवई, ज्योती गायकवाड, सतिशमुखेकर, अंजुम पठाण,शंकर शिरसाट, बद्रीनाथ धरपळे यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या वेळी विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रदर्शन सुद्धा केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा शेवट झाला. सदर कार्यक्रमाची चर्चा परिसरात दिसून येत आहे.

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२५/२०२६ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : १४-११-२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **शेख रहीम शेख चाँद** यांनी मोहल्ला **वार्ड क्र. १५** सोयगांव स.नं. ----- मधील प्लॉट घर क्र. **१८६९/२** त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : शेख शफीक शेख गुलाब यांची जागा** **पश्चिम : सरकारी वापराचा रस्ता**
**दक्षिण : शेख रफीक शेख गुलाब यांची जागा** **उत्तर : शेख रफीक शेख कालु शिकलकर यांची जागा**

आकार : पूर्व पश्चिम **१०८९=00 चौ. फु.** दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबतच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, गंगापूर यांचे न्यायालयात**

प्रकरण क्र. Civil MA. क्र.७४६/२०२५
नारायण हनुमान शिंदे व इतर विरुध्द Nil
विषय- वारस हक्क मिळणे बाबत.

ज्या अर्थि वरील अर्जदाराने श्री योगेश कानडे वकील, गंगापूर यांच्या मार्फत मयत हनुमान काशिनाथ शिंदे यांच्या वारसासंबंधी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. मयत हनुमान काशिनाथ शिंदे यांचा मृत्यु दिनांक ०२.०१.२०२५. रोजी झाला अर्जदार क्र. १ हा त्यांचा मुलगा आहे व अर्जदार क्र.२ ही पत्नी आहे तसेच अर्जदार क्र.३ ते ७ ह्या मुली आहे, व अर्जदार १ ते ७ मयत हनुमान काशिनाथ शिंदे वारस आहेत. या व्यतिरिक्त कोणतेही वारस नाही.

२. या जाहीर प्रगटनाव्दारे आम जणतेस कळविण्यात येते की, वरील अर्जदारांना प्रशासन पत्र देण्यास कोणाचा काही आक्षेप असल्यास त्यांनी आपला उजर, आक्षेप वरील न्यायालयात प्रकरणात नमुद निर्धारीत तारखेपुर्वी व तारखेच्या दिवशी दाखल करावा. करीता आज दिनांक १५/११/२५ रोजी माझ्या सहिनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले आहे.

आदेशावरुन
कनिष्ठ लिपिक न्यायालय अधिक्षक,
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, गंगापूर

### जाहीर प्रगटन

**मा. जिल्हा न्यायाधिश साहेब न्यायालय गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.८९/२०२५

अर्जदार : १) सार्थक पि. राजाराम झळके वय ०८ वर्षे अपाक आई अर्जदार क्र.२ २) स्वाती भ्र. राजाराम झळके, वय ३० वर्षे धंदा घरकाम रा. जिकठाण ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ह.मु. पाटोदा ता. जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार – महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर

प्रकरण- कलम ८ (२) अज्ञानत्व व पालकत्वचे अधिनियम १८९० अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.बी. पदार यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र.२ व मयत राजाराम अंबादास झळके हे आपसात पति पत्नी असुन त्यांना अज्ञान अर्जदार क्र.१ हा मुलगा आहे. मयत राजाराम अंबादास झळके हे दिनांक २७/०८/२०२१ रोजी मयत झाले असुन मृत्युपुर्वी मयताचे नावे मौजे सुलतानपुर (जिकठाण) ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे गट क्र.५१ मध्ये वडीलोपार्जीत ०.४४ आर. जमिन असुन सदरील ४४ आर. जमिन ही अर्जदार क्र.१ व २ यासर्वांचे नावे वारसाने फेरफार क्र.८२८ नुसार आलेली आहे. वर नमुद केलेली ४४ आर. जमिन विक्री करणे असल्याने अर्जदारांनी अज्ञान अर्जदार क्र.१ चा असलेल्या हिश्यासह संपूर्ण जमिन विक्रीची परवानगी मिळणे कामी या न्यायालयात सादर केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.

करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १४/११/२०२५ दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
जिल्हा न्यायालय गंगापूर

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# पुन्हा एकदा मंगलराज

बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला मिळालेल्या दणदणीत विजयाचे 'अभूतपूर्व' या शब्दातच वर्णन करावे लागेल. बिहारमध्ये रालोआ विजयी होणार, याबद्दल कोणाच्याच मनात शंका नव्हती. मात्र रालोआचा विजय हा एवढा एकतर्फी राहील, अशी कल्पनाही कुणी केली नव्हती हेही खरे. बिहारमधील रालोआच्या या विजयाचे खरे शिल्पकार पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आहेत. रालोआ या निवडणुकीत १६० च्या वर जागा जिंकेल, असा विश्वास या दोन्ही नेत्यांनी व्यक्त केला होता; प्रत्यक्षात रालोआ २०० च्या घरात गेला. रालोआने राज्यात हा विक्रमी आकडा दुसऱ्यांदा गाठला आहे. बिहारमध्ये रालोआ आणि महाआघाडी यांच्यात चुरशीची लढत असल्याने जी आघाडी जिंकेल आणि जी पराभूत होईल, त्यांच्यात जागांचा फार थोडा फरक राहील, असे वाटत होते. पण बिहारच्या जनतेने हा अंदाज खोटा ठरवला आणि रालोआला छप्पर फाड के बहुमत दिले. बिहारी लोक राजकीयदृष्ट्या किती सजग आहेत, याचाच हा पुरावा.

गेल्या दोनेक दशकांपासून नितीशकुमार बिहारचे मुख्यमंत्री राहिले आहेत. आतापर्यंत नऊ वेळा त्यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. दहाव्यांदाही त्यांना संधी मिळेल, असे सध्या तरी दिसते. पुढची समीकरणे कशी आकार घेतात यावर ते ठरेल. सुरुवातीला प्रकृतीच्या कारणावरून नितीशकुमार यांना धारेवर धरण्यात आले होते. पण बिहारचे खरे आणि लोकप्रिय नेते नितीशकुमारच आहेत, हे या निवडणूक निकालांनी सिद्ध झाले. मागील विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत जदयुच्या जागांमध्येही यावेळी लक्षणीय वाढ झाली आहे. जदयुला दणदणीत विजयाची पूर्ण खात्री होती. मतमोजणीच्या आधीपासूनच राजधानी पाटण्यात 'टायगर अभी जिंदा है' असा मजकूर असलेले मोठमोठे होर्डिंग्ज लावण्यात आले होते. ही तयारी सार्थ होती आणि नितीशकुमार बिहारचे निर्विवाद नेते आहेत, हे या निकालांनी पुन्हा एकदा सिद्ध झाले. बिहारची निवडणूक रालोआ आणि महाआघाडी उर्फ महागठबंधन यांच्यात लढली गेली. रालोआचे नेतृत्व जनता दल संयुक्तचे नेते आणि विद्यमान मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्याकडे होते, तर महाआघाडीचे नेतृत्व राजदचे तेजस्वी यादव यांच्याकडे होते. जदयु आणि राजद हे दोन्ही प्रादेशिक पक्ष. पण भाजपा आणि काँग्रेस या दोन्ही मोठ्या पक्षांना ही निवडणूक जदयु आणि राजद या दोन प्रादेशिक पक्षांचे बोट पकडून लढवावी लागली. मतमोजणीनंतर भाजपाने आपण मोठा भाऊ असल्याचे सिद्ध केले, हे खास. काँग्रेसची काय गत झाली, ते साऱ्यांनीच पाहिले.

रालोआने बिहार विधानसभा निवडणुकीत दुहेरी शतक झळकावले आहे. २०० च्या आसपास जागांचा पल्ला गाठला आहे. महाआघाडीला फार मोठा फटका बसला आहे. बिहारच्या या निकालांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालांची आठवण करून दिली. गेल्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडी सत्तेवर येईल, असे वातावरण होते. लोकसभा निकालांची त्याला पृष्ठभूमी होती. मात्र महायुतीने विधानसभेच्या २०० च्या आसपास जागा जिंकत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. बिहारमध्ये तसेच झाले. हे अकल्पित असले तरी मतदारांनी ठरविले तर काय घडू शकते, याची ही ग्वाही आहे हेच खरे. रालोआच्या या विजयाचे श्रेय भाजपाचे निवडणूक प्रभारी आणि केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान तसेच भाजपाचे राष्ट्रीय महासचिव आणि बिहारचे प्रभारी विनोद तावडे यांना द्यावे लागेल. याशिवाय, महाराष्ट्राचे सुपुत्र केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही श्रेय द्यावे लागेल. बिहारमध्ये रालोआच्या विजयात या दोन्ही नेत्यांचा वाटा मोठा आहे. त्यांनी अनेक ठिकाणी सभा घेतल्या. बिहारमधील रालोआच्या विजयात महाराष्ट्रातील या तीन महाराष्ट्रीय नेत्यांचे योगदान कोणालाच नाकारता येणार नाही.

रालोआने बिहारची निवडणूक विद्यमान मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वात लढवण्याची घोषणा केली होती. मात्र, नितीशकुमार यांना रालोआचा मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले नव्हते. नवनिर्वाचित आमदार नवा मुख्यमंत्री ठरवतील, असे भाजपा नेते सांगत होते. येणाऱ्या काळात नेमके काय ते कळेल. महाआघाडीने मात्र राजदचे तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचा तर व्हीआयपीचे नेते मुकेश सहानी यांना उपमुख्यमंत्रिपदाचा उमेदवारही जाहीर केले होते. या निवडणुकीत व्हीआयपीला आपले खातेही उघडता आले नाही. तेजस्वींच्या नेतृत्वात सरकार येण्याचा प्रश्न तर पार निकालीच निघाला.

महाआघाडीची सत्ता आल्यावर काँग्रेस पक्षाचा एक तसेच अल्पसंख्यक समाजातून एक असे आणखी दोन उपमुख्यमंत्री देण्याची घोषणाही महाआघाडीने केली होती. तेजस्वी यादव यांनी तर आपले मंत्रिमंडळही तयार करून ठेवले असावे. अर्ध्या हळकुंडात पिवळे होणे म्हणजे काय, हे तेजस्वी यादव यांनी दाखवून दिले. नितीशकुमार यांच्या तुलनेत तेजस्वी यादव हे तरुण रक्ताचे नेते. पण, तेजस्वी यादव यांच्या जोशवर नितीशकुमार यांच्या होशने मात केली, असे म्हणायला हरकत नाही. योगायोग म्हणजे बिहार विधानसभा निवडणुकीचे निकाल १४ नोव्हेंबरला जाहीर झाले; हा दिवस बाल दिवस म्हणून देशात साजरा केला जातो. यादिवशी लालूप्रसादांच्या दोन बालांची स्वप्ने हवेत विरली. नाव मोठे आणि लक्षण खोटे अशी या दोघांची स्थिती झाली. बिहारच्या मतदारांनी या दोघांना त्यांची जागा आणि लायकी दाखवून दिली. देशाच्या अन्य भागांप्रमाणे बिहारातही काँग्रेसचे पानिपत झाले. विधानसभा निवडणुकीच्या आधी काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बिहारमध्ये मतदार अधिकार यात्रा काढली होती. त्या यात्रेला बऱ्यापैकी प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे काँग्रेसचा उत्साह वाढला होता. परंतु, त्या उत्साहावर विरजण टाकणारा निकाल आला आहे. राहुल गांधींच्या नंतर राजद नेते तेजस्वी यादव यांनीही बिहारमध्ये एक यात्रा काढली. या दोन्ही यात्रांचा काहीच परिणाम मतदारांवर झाला नाही. राहुल गांधी हे काँग्रेसचे सर्वांत अपयशी नेते आहेत, हे या निवडणूक निकालांनी पुन्हा एकदा सिद्ध झाले. राहुल गांधी काँग्रेसला आतापर्यंत एकही निवडणूक जिंकून देऊ शकले नाहीत. नवीन राज्यात काँग्रेसची सत्ता आणणे तर दूर; पण ज्या राज्यात काँग्रेसची सत्ता होती, तिथली सत्ताही ते टिकवू शकले नाहीत. निवडणूक कशी लढवावी, निवडणुकीचे नियोजन कसे करावे, हे काँग्रेस नेत्यांनी अमित शाह यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. तर, निवडणूक कशी लढवू नये, हे काँग्रेस आणि महाआघाडीकडून शिकले पाहिजे, असे हा निकाल सांगतो.

बिहारमध्ये महिला आणि तरुणांनी नितीशकुमार यांच्या बाजूने मतदान केले, असे दिसते. महिलांसाठी नितीशकुमार यांच्या सरकारने महिला स्वयंरोजगार योजना जाहीर केली. महिलांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी नितीशकुमार सरकारने त्यांच्या खात्यात प्रत्येकी १० हजार रुपये जमा केले. राज्यातील ७५ लाख महिलांच्या खात्यात असे पैसे जमा झाले. नंतर ही संख्या वाढत-वाढत दीड कोटीपर्यंत गेली. महिलांना नंतर त्यांच्या रोजगारासाठी दोन लाख रुपये देण्याचेही सरकारने जाहीर केले होते. त्याचा सकारात्मक परिणाम झाला. महाराष्ट्रातील महायुतीचा विजय हा जसा लाडकी बहीण योजनेचा होता, तसाच बिहारमधील रालोआचा विजय हा या योजनेचा विजय म्हणावा लागेल. त्यामुळे यावेळी पुरुषांच्या तुलनेत महिलांच्या मतदानाची टक्केवारी जास्त होती. तरुणांना एक कोटी नोकऱ्या देण्याची घोषणाही रालोआने केली होती. त्यामुळे तरुणांनी रालोआच्या बाजूने भरभक्कम मतदान केले, असे दिसते. महाआघाडीनेही अशाच आशयाची आश्वासने दिली होती, पण त्यांच्या आश्वासनांपेक्षा मतदारांना रालोआच्या आश्वासनाची विश्वसनीयता जास्त वाटली असावी. एकुणात रालोआच्या दणदणीत विजयाने बिहारमध्ये पुन्हा एकदा डबल इंजिन सरकारचा मार्ग प्रशस्त झाला आहे. त्यामुळे बिहारच्या प्रगतीला आणखी वेग येणार आहे. बिहारमध्ये महाआघाडीच्या जंगलराजचे सावट निकालात काढताना मतदारांनी रालोआच्या मंगलराजला आपली पसंती दिली, हेच या निवडणुकीच्या निकालांनी स्पष्ट झाले आहे.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# परंतु तेथे भैरवाचे अधिष्ठान पाहिजे...

१० नोव्हेंबर २०२५, संध्याकाळी ६.५२ वाजता दिल्लीतील लाल किल्ल्याजवळील चांदनी चौक आणि नेताजी सुभाष मार्गाच्या टोकावर, लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट नंबर १ जवळ एका कारमध्ये स्फोट झाला आणि पुन्हा एकदा थरकाप उडाला. स्फोटामुळे परिसरातील इतर वाहनांना आग लागली आहे. १३ जण मृत व २० हून अधिक जखमी झाल्याची बातमी समोर येत आहे. या कारमध्ये डॉ. उमर नबी होता, तो देखील यात दगावला आहे. मात्र हा उमर आत्मघाती बॉम्बर असल्याची माहिती येत आहे. या प्रकरणात ५ ते ९ संशयितांना अटक करण्यात आली आहे. ज्यात प्रामुख्याने डॉ. मुजम्मिल, डॉ. शाहीन सईद (महिला डॉक्टर), डॉ. आदिल अशा उच्चशिक्षित डॉक्टरांचा सहभाग आहे. आत्मघाती बॉम्बर डॉ. उमर नबी हा देखील पेशाने उच्चशिक्षित डॉक्टर होता. ओसामा बिन लादेनही उच्चशिक्षित होता हे देखील आपण इथे समजून घेतलं पाहिजे. त्यामुळे शिक्षणाच्या अभावामुळे लोक अतिरेकी होतात किंवा कुणावर अत्याचार होतो, सतत टीका होते म्हणून लोक दहशतवादी होतात हे पूर्णपणे खोटं आहे. तसं असतं तर डायरेक्ट ॲक्शनमधील, काश्मीरमधील नरसंहाराला आणि अत्याचाराला बळी पडलेला हिंदू समाजही अतिरेकी झाला असता. काँग्रेस आणि पुरोगाम्यांनी हिंदूंना भगवा आतंकवाद असा लेबल लावला असला तरी हिंदू आजतागायत ज्ञानेश्वरांच्या जाणिवेने जगत आले आहेत. आपल्यावरील अत्याचार विसरून ''विश्व स्वधर्म सूर्ये पाहो'' हेच म्हणत आले आहेत. म्हणूनच एक गोष्ट समजून घेतली पाहिजे की अतिरेकी व्हायला हेतू व परिस्थिती कारणीभूत ठरते. हेतू म्हणजे पैसे कमावणे किंवा आकाशातल्या ईश्वराच्या मार्गावरून चालणे इत्यादी. परिस्थिती म्हणजे तुम्ही कोणत्या कुळात जन्माला येता. तुम्ही वाळवंटी प्रदेशाला किंवा इतर भूप्रदेशाला पुण्यभूमी मानत असणाऱ्या कुळात जन्माला आला असाल तर परिस्थितीने तुम्हाला अतिरेकी होण्याची प्रेरणा मिळते. कारण दुर्दैवाने तसे संस्कार बालमनावर केले जातात. यातले अनेक अतिरेकी हे पैसे कमावण्यासाठी अतिरेकी बनत नाहीत. तर आतंकवाद हा त्यांचा आध्यात्मिक मार्ग आहे. जे आपल्या वाळवंटी कुळाचे नाहीत त्यांचा सर्वनाश करणे, त्यांच्यावर अत्याचार करणे ही त्यांची आध्यात्मिक प्रक्रिया आहे हे समजून घेतलं पाहिजे. वरील सर्व उच्चशिक्षित, चांगले पैसे कमावणाऱ्या, चांगली कारकीर्द असणाऱ्या डॉक्टरांना या जाणिवेतून प्रेरणा मिळाली आहे, तसे संस्कार त्यांच्या बालमनावर झाले आहेत हे समजून घेणे अतिशय आवश्यक आहे. आता



आपल्या भारताचे नेतृत्व, पोलिसी यंत्रणा, न्याय यंत्रणा या स्फोटामागील दोषींना पकडून शिक्षा सुनावेल यात दुमत नाही. मात्र सुमारे दहा वर्षांनंतर सीमा प्रदेश वगळता भारताच्या आत अशाप्रकारचं जिहादी कृत्य झालं आहे. याचा अर्थ भारतातले, भारतातंच जन्मलेले स्लिपर सेल हे आदेशाची वाट बघत तयारी करत असतात हे उघड आहे. त्यामुळे यापुढे कोणाकडून खरेदी करावी, याचबरोबर कोणाकडून इतर सेवा घ्यायच्या याचाही विचार भारतीयांना दुर्दैवाने करावा लागणार आहे. कारण उच्चशिक्षित डॉक्टर स्फोट करू शकतात तर त्याच प्रेरणेतून ते रुग्णांना चुकीची, जीवघेणी औषधेही देऊ शकतात. हाच न्याय इतर सेवा देणाऱ्यांना देता येईल. त्यामुळे भारतीयांनी अखंड सावधान असले पाहिजे.

भारतावर केवळ अतिरेक्यांचे संकट नसून इतरही अनेक समस्या आहेत. आपण सर्व जण ईश्वराचा धावा करतो ते स्वतःच्या वैयक्तिक समस्यांसाठी. पण देशाच्या संरक्षणासाठी, उन्नतीसाठी देवासमोर सहसा हात जोडत नाही किंवा अनुष्ठान व व्रत करत नाही. सावरकर म्हणाले होते की ''स्वातंत्र्यप्राप्तीसाठी देवापुढे एक फूल जरी अर्पण केलं असेल तरी त्याच्यामुळेही स्वातंत्र्य मिळालं आहे.'' म्हणजेच त्या काळी स्वातंत्र्यप्राप्ती हे प्रत्येक भारतीयाचं ध्येय होतं. आताही प्रत्येक भारतीयाने हिंदुस्थानाचे संरक्षण आणि उन्नतीसाठी प्रयत्न करायला हवेत. तसेच श्रद्धाळूंनी नित्य उपासनेत आणि इतर अनुष्ठानातही देशाचा विषय समावेश करून घ्यायला हवा. स्वतःला नास्तिक समजणाऱ्या देशभक्तांनीही एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की आपला सामना श्रद्धेसाठी निर्दयीपणे, क्रूरपणे, अमानवी, शैतानी पद्धतीने जीव घेणाऱ्या आणि देणाऱ्या वृत्तीशी आहे. त्यामुळे इथे आपला नास्तिकवाद काही कामाचा नाही. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी ''स्वराज्य व्हावे ही श्रींची इच्छा'' असे म्हटले. पण ते श्रींची प्रतीक्षा करत बसले नाहीत तर स्वतःच श्री होऊन कार्य करत होते. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांनी श्रींच्या इच्छेखातर स्वतःच्या शरीराची समिधा केली. या दोन्ही महापुरुषांना श्रींकडून प्रेरणा मिळाली. हेच आहे भगवंताचे अधिष्ठान... १२ नोव्हेंबर २०२५ रोजी भैरव जयंतीनिमित्त अहिल्यानगर येथील श्री पीतांबरा बगलामुखी शक्ति पीठम् येथे भैरव चंडी यज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये हजारो भाविक सहभागी झाले होते. हे हवन पीठाधीश श्री मयूरेश विसपुते गुरुजी यांच्या नेतृत्वात पार पडले. विशेष म्हणजे दक्षिण भारतातून अनेक ब्राह्मण आणि गुरू समान व्यक्तींनीही उपस्थिती लावली. ३ वर्षांपूर्वी भैरव चंडी यज्ञासाठी साधारण ५०-६० लोक आले असतील आणि आता हजारोंची संख्या गाठण्यात पीठमला यश लाभले आहे. विशेष म्हणजे कार्यक्रमात भव्यता आली असली तरी दिव्यता जराही कमी झालेली नाही. उलट ती आणखी वृद्धिंगत झाली आहे. मयूरेश गुरुजींची दैवतावरील श्रद्धा, उपासना आणि भक्त, शिष्य व कार्यकर्त्यांचे कष्ट यातूनच हा अद्भुत सोहळा संपन्न होऊ शकला आहे. कोणतीही बुवाबाजी न करता शुद्ध साधनेच्या बळावर इतक्या तरुण वयात त्यांनी अतिशय मानाचं स्थान प्राप्त केलं आणि भक्तवर्ग निर्माण केला हे त्यांचं कौशल्य आहे. गुरुजींना तुम्ही अनेक पॉडकास्टमध्ये पाहिले असेल. या कार्यक्रमात लोक आपापल्या समस्या घेऊन आले होते. आपल्या समस्यांचं निवारण करण्यासाठी त्यांनी यज्ञात आहुती दिल्या. मात्र गुरू कसा असावा याचं उत्तम उदाहरण म्हणजे मयूरेश गुरुजी! गुरूने भक्तांना केवळ भौतिक किंवा आध्यात्मिक गोष्टीत गुंतवून न ठेवता राष्ट्राचा व धर्माचाही विचार करायला लावला पाहिजे. गाईची पूजा करता करता आपण गाय होऊ नये अशी सावरकरप्रभृती क्रांतिकारकांची धारणा होती. देवीचं वाहन वाघ आहे, सिंह आहे. प्रत्येक देवतेच्या हातात शस्त्र आहे याचा विसर पडू नये हीच महापुरुषांची इच्छा होती. म्हणूनच कदाचित नितेश राणे यांनी वराह जयंतीचा आग्रह धरला असावा. आता येणारा काळ अधिक कठीण असणार आहे. यंत्रणा आपलं काम करेल. पण भारतीयांना आता समाज एकसंध ठेवावा लागणार आहे. प्रबोधनाचे अद्भुत पर्व सुरू करावे लागणार आहे. त्याचबरोबर संकटांचा सामना करण्यासाठी सज्ज राहावे लागेल. मात्र एक गोष्ट लक्षात ठेवावी लागेल. हे सर्व जरी केले तरी तेथे भैरवाचे अधिष्ठान पाहिजे!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# उत्तरप्रदेश महिलांसाठी सुरक्षित

महिलांना सायंकाळी ६ वाजेनंतर कार्यालय किंवा कामाच्या ठिकाणी थांबवू नये किंवा त्यांच्याकडून काम करवून घेऊ नये, असा शासकीय नियम आहे. असा नियम करण्याचे कारण म्हणजे कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ झाल्याची अनेक प्रकरणे घडली. अनेक प्रकरणांत अशा प्रकरणात दोषी असलेल्यांवर कारवाई होऊन त्यांना शिक्षा झाल्याचे सर्वज्ञात आहे. तसेच, मुली, महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सातच्या आत घरात, असा सर्वसाधारण सर्वच कुटुंबांमध्ये अलिखित नियम आहे. याचा विचार करूनच सरकारने महिलांना सायंकाळी ६ नंतर कार्यालयात किंवा कामाच्या ठिकाणी थांबवू नये. सायंकाळी कामाची वेळ संपल्यावर त्यांच्याकडून ओव्हर टाईम करवून घेऊ नये, असा नियम तयार करण्यात आला.

मात्र, उत्तर प्रदेशातील योगी सरकारने महिलांना रात्रपाळीच्या कामाची परवानगी देण्याचा निर्णय घेतला. यावरून योगी सरकारला उत्तर प्रदेशमध्ये महिलांच्या सुरक्षेबाबत केलेले नियम, कायदे आणि राबविण्यात येत असलेल्या योजनांची योग्य अंमलबजावणी होत असल्याचा आत्मविश्वास असावा. कामगार महिलांच्या सक्षमीकरणाच्या दिशेने उचललेले हे मोठे आणि महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे म्हटले जात आहे. महिला सुरक्षेबाबत केलेल्या उपायांची चाचपणी म्हणूनही हा निर्णय घेण्यात आला असावा. यापूर्वी महिला रात्रपाळीत काम करत नव्हत्या असे नाही. पण, ती क्षेत्रे वेगळी होती. आरोग्य व तत्सम विभागात या आधी देखील महिला रात्रपाळीत काम करीत होत्या. पण, कारखाने किंवा विविध धोकादायक उद्योग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या १२ उद्योगांतच त्या काम करू शकत होता. उ. प्र. सरकारच्या या निर्णयाने आता २९ धोकादायक उद्योगांत काम करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. आज महिला सर्वच क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीने काम करताना आपण पाहतो. वैद्यकीय, अभियांत्रिकी, संगणक, शैक्षणिक एवढेच नव्हे तर, आज महिला वैमानिक, टॅक्सीचालक, रेल्वे इंजिनचालक झाल्या आहेत. अवकाश क्षेत्रातही महिला काम करीत आहेत. केवळ सुरक्षितता नसल्याने त्यांना रात्रपाळीची कामे करता येत नव्हती. त्यातही उ. प्र. सारख्या राज्यात सायंकाळी ७ नंतर महिलांना बाहेर पडणे शक्य होत नव्हते. कारण, या राज्यात यापूर्वी बाहुबली, माफियांचे राज्य होते. महिलांच नव्हे तर, पुरुष देखील सुरक्षित नव्हते. सकाळी घराबाहेर पडलेली व्यक्ती सायंकाळी घरी सुखरूप येईल की नाही, अशी भीती होती. त्यामुळे महिलांनी रात्रपाळीच काय तर, कामावर जाणे देखील टाळले जात होते. पण, योगी सरकार आल्यापासून या राज्यातील गुंडाराज संपवून कायद्याचे राज्य स्थापन झाले आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची उत्तर प्रदेशातील गुन्हेगारांमध्ये चांगलीच जरब निर्माण झाली आहे. बुलडोझरबाबा म्हणून त्यांची नवी ओळख निर्माण झाली आहे. आपल्या राज्यात कामगार महिलांवर कोणीही अत्याचार करणार नाही, असा आत्मविश्वास योगीजींना असल्यामुळे त्यांनी हा निर्णय घेतला असावा. यासाठी महिला कामगारांना संमतिपत्र दिल्यानंतरच रात्रपाळीत काम करता येणार आहे. महिलांच्या सुरक्षेबाबत कारखान्यांमध्ये सुरक्षा, आरोग्य व वाहतूक सुविधा उपलब्ध करून देणे कारखानदारांना अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच, कामाच्या ठिकाणी चोवीस तास सीसीटीव्हीची नजर राहणार आहे. महिला सुरक्षारक्षकही तैनात करावे लागणार आहे. या सुविधांमुळे महिलांना विश्रांतीशिवाय सलग सहा तास काम करता येणार आहे. महिलांना आपले उत्पन्न वाढविण्यासाठी कामाच्या वेळेनंतर ज्यादा तास काम करता येणार आहे. महिलांसाठी कामाच्या तासांची मर्यादा आता १४४ तास करण्यात आली आहे. पूर्वी ही ७५ तास होती. या निर्णयामुळे महिला कामगारांना आपले कौशल्य विकसित करून आत्मविश्वासाने काम करून आपला आर्थिक विकास साधण्याची संधी प्राप्त होणार आहे. सुरक्षेच्याबाबतीत व विशेषतः महिलांच्या सुरक्षेबाबत कुप्रसिद्ध असलेले उत्तर प्रदेश योगी सरकारच्या या निर्णयामुळे महिलांबाबत सुरक्षित राज्य होण्याकडे मोठे पाऊल टाकत आहे. तेव्हा, योगी सरकारच्या या निर्णयाच्या फलश्रुतीकडे देशाचे लक्ष असणार आहे, हे नक्की!

८८०६००६१४९

## प्रासंगिक

**डॉ. अशोक उईके**

# आदिवासी परंपरेचा प्रेरणादायी वारसा

भारताच्या सांस्कृतिक विविधतेचा अविभाज्य भाग असलेल्या आदिवासी समाजाचे देशाच्या इतिहासात आणि विकास प्रवासात एक महत्त्वपूर्ण स्थान आहे. या समाजाने केवळ आपल्या परंपरा, संस्कृती आणि मूल्यव्यवस्था जपल्या नाहीत, तर स्वातंत्र्य संग्रामातही शौर्य, बलिदान आणि स्वाभिमानाचे प्रेरणादायी उदाहरण घालून दिले आहे. या अमूल्य योगदानाची स्मृती जपण्यासाठी आणि आदिवासी स्वातंत्र्यसैनिकांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी १५ नोव्हेंबर हा दिवस 'जनजाती गौरव दिवस' म्हणून साजरा केला जातो.

**भगवान बिरसा मुंडा : आदिवासी अस्मितेचे प्रतीक :** जनजाती गौरव दिवस हा महान आदिवासी नेता, स्वातंत्र्य सैनिक आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रणेते भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध 'उलगुलान' या क्रांतीचे नेतृत्व केले आणि आदिवासी समाजाला स्वाभिमान, एकता आणि स्वावलंबनाचा संदेश दिला. भगवान बिरसा मुंडा हे केवळ स्वातंत्र्य सैनिक नव्हते, तर ते आदिवासी समाजातील सामाजिक न्याय आणि धार्मिक सुधारणा चळवळीचेही अग्रदूत होते. त्यांच्या कार्याने आदिवासी समाजात नवचेतना निर्माण केली. आजही त्यांची परंपरा नवनिर्माण आणि सक्षमीकरणासाठी प्रेरणा देणारी ठरते.

**जनजाती गौरव वर्षाचा प्रारंभ :** भगवान बिरसा मुंडा यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त देशभरात 'जनजाती गौरव वर्ष' साजरे करण्यात येत आहे. केंद्र शासनाने १५ नोव्हेंबर २०२४ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत हा उत्सव साजरा करण्यास मान्यता दिली होती. या वर्षभर चालणाऱ्या कार्यक्रमांच्या माध्यमातून देशभरातील आदिवासी समाजाच्या संस्कृती, इतिहास आणि योगदानाचे प्रदर्शन, अभ्यास व प्रसार करण्यात येणार आहे. विविध मंत्रालये, राज्य शासन, शैक्षणिक संस्था आणि सांस्कृतिक संघटनांच्या माध्यमातून सेमिनार, प्रदर्शन, शिबिरे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**केंद्र शासनाची जनजाती कल्याणाची भूमिका :** केंद्र शासनाने आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने अनेक महत्त्वपूर्ण योजना राबवल्या आहेत. प्रधानमंत्री जनजातीय आदिवासी न्याय महाअभियान (पीएम-जनमन), एकलव्य मॉडेल निवासी शाळा (ईएमआरएस), वन धन विकास केंद्रे, तसेच प्रधानमंत्री आदिवासी विकास अभियान यांसारख्या योजनांद्वारे आदिवासी समाजाच्या शिक्षण, आरोग्य, रोजगार व सांस्कृतिक जतनावर भर दिला जात आहे. या उपक्रमांमुळे आदिवासी समाजाच्या जीवनमानात सुधारणा होत असून, देशाच्या सर्वसमावेशक विकासात त्यांचा सहभाग अधिक बळकट होत आहे.



**संस्कृती, वारसा आणि आत्मसन्मानाचे प्रतीक :** जनजाती गौरव वर्ष हा केवळ स्मरणाचा उत्सव नाही, तर तो आदिवासी समाजाच्या आत्मसन्मान, संस्कृती आणि वारशाच्या पुनरुज्जीवनाचा राष्ट्रीय सोहळा आहे. या उपक्रमातून भारतातील प्रत्येक नागरिकाला आदिवासी समाजाचे योगदान ओळखण्याची आणि त्यातून प्रेरणा घेण्याची संधी मिळणार आहे. देशातील आदिवासी समाजाच्या जीवनशैलीत आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी केंद्र सरकारकडून महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. पीएम जनमन योजना व धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या जीवनात शाश्वत विकास घडवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान :** देशातील आदिवासी जमातींच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी केंद्र सरकारतर्फे 'धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी २५ प्राधान्य क्षेत्रे आणि १७ मंत्रालये निश्चित करण्यात आली आहेत. महाराष्ट्र राज्यातील ३२ जिल्ह्यांची निवड या अभियानासाठी करण्यात आली असून, यात २१४ तालुके आणि ४,९७५ गावे समाविष्ट आहेत. या अभियानामार्फत केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांमध्ये संरचित दृष्टिकोन व अभिसरण साध्य करून प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यात आली आहे. अभियानात समाविष्ट गावांतील अनुसूचित जमातींच्या कुटुंबांच्या वैयक्तिक व सामूहिक सुविधांच्या अभावाचा तपशील 'मिशन अंत्योदय २०२२-२३' च्या माहितीच्या आधारे निश्चित करण्यात आला आहे.

**पीएम-जनमन महाअभियान :** समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणे हा दृष्टिकोन ठेवून विकासाच्या प्रवाहापासून वंचित घटकांना इतरांच्या बरोबरीने समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र व राज्य प्रयत्न करीत आहेत आहे. वंचित आदिवासी समूहांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीत सुधारणा घडवून त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी विविध लोककल्याणकारी योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. आदिवासी समूहांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अपेक्षित उद्दिष्ट साध्य करण्याकरिता प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियानाची (पीएम-जनमन) सुरुवात करण्यात आली आहे. या अंतर्गत ९ मंत्रालयांच्या माध्यमातून सर्वांना पक्की घरे, प्रत्येक घरी नळाने पाणी, गावा-गावापर्यंत रस्ते, प्रत्येक घरापर्यंत वीज, शिक्षणासाठी वसतिगृह, कौशल्य विकास, गावोगावी फिरते वैद्यकीय पथक, सर्वांना पोषण, प्रगत जीवनमान, दुर्गम भागापर्यंत दूरसंचार सेवा अशा एकूण ११ महत्त्वाच्या कार्यक्रमांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

**शबरी नॅचरल्सद्वारे आदिवासी उत्पादनांना जागतिक बाजारपेठ :** आदिवासी संस्कृतीचा समृद्ध वारसा आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जतन करून त्याला नव्या उंचीवर नेण्याचे कार्य 'शबरी नॅचरल्स' या उपक्रमाद्वारे करण्यात येत आहे. आदिवासी विकास महामंडळाच्या या अभिनव उपक्रमाने ई-कॉमर्सच्या माध्यमातून आदिवासी उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत नवी ओळख मिळवून दिली आहे.

या उपक्रमांतर्गत आदिवासी बांधवांनी पारंपरिक पद्धतीने तयार केलेल्या हस्तकला, खाद्यपदार्थ, वनौषधी आणि नैसर्गिक उत्पादनांना नव्या बाजारपेठांचा प्रवेश मिळाला आहे. 'शबरी नॅचरल्स'च्या माध्यमातून ग्रामीण आणि दुर्गम भागातील आदिवासी उत्पादकांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. या उपक्रमामुळे आदिवासी समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणास चालना मिळाली असून, त्यांच्या पारंपरिक ज्ञान आणि कौशल्याला नवे व्यावसायिक मूल्य प्राप्त झाले आहे. शाश्वत विकासाच्या दिशेने 'शबरी नॅचरल्स' हे एक आदर्श मॉडेल म्हणून उदयास येत आहे.जनजाती गौरव वर्ष हा आदिवासी समाजाच्या परंपरा, संस्कृती आणि योगदानाचा गौरव करणारा उत्सव आहे. या उपक्रमांद्वारे आदिवासी समाजाच्या विकासाचा प्रवास केवळ साजरा होत नाही, तर तो देशाच्या सर्वांगीण प्रगतीचा महत्त्वाचा घटक ठरतो. आदिवासी संस्कृती, कला आणि वारसा जतन करण्यासोबतच त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचा प्रयत्न शासन सातत्याने करत आहे.

(लेखक राज्याचे आदिवासी विकास मंत्री आहेत.)

## आजचे संघगीत-४३

शनिवार, १५ नोव्हेंबर २०२५

### जाग उठा है आज देश का वह सोया अभिमान

जाग उठा है आज देश का वह सोया अभिमान
प्राची की चंचल किरणों पर आया स्वर्ण विहान ॥ जाग उठा...

स्वर्ण प्रभात खिला घर-घर में जागे सोये वीर
युद्धस्थल में सज्जित होकर बढ़े आज रणधीर
आज पुनः स्वीकार किया है असुरों का आव्हान ॥ जाग उठा...

सहकर अत्याचार युगों से स्वाभिमान फिर जागा
दूर हुआ अज्ञान पार्थ का धनुष-बाण फिर जागा
पांचजन्य ने आज सुनाया संसृति को जयगान ॥ जाग उठा...

जाग उठी है वानर-सेना जाग उठा वनवासी
चला उदधि को आज बाँधने ईश्वर का विश्वासी
दानव की लंका में फिर से होता है अभियान ॥ जाग उठा...

खुला शम्भु का नेत्र आज फिर वह प्रलयंकर जागा
तांडव की वह लपटें जागी वह शिवशंकर जागा
तालताल पर होता जाता पापों का अवसान ॥ जाग उठा...

ऊपर हिम से ढकी खड़ी हैं वे पर्वत मालाएँ
सुलग रही हैं भीतर-भीतर प्रलयंकर ज्वालाएँ
उन लपटों में दीख रहा है भारत का उत्थान ।॥ जाग उठा...

## भारतातील लोकशाहीतील पंचम स्तंभ

भारतात लोकशाही आहे आणि त्याची भिस्त चार खांबांवर आहे म्हणतात. १) विधिमंडळ : कायदे बनवण्याचे कार्य करते.२) कार्यकारी मंडळ : बनवलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करते.३) न्यायपालिका : कायद्यांचा अर्थ लावण्याचे आणि न्याय देण्याचे काम करते. ४) माध्यमे : जनतेला खरी माहिती पुरवून लोकशाहीला सक्षम बनवते, याला लोकशाहीचा चौथा स्तंभ असेही म्हणतात.

यातला एकही स्तंभ जर तुटला, ढासळला, नुसता त्याला चिरा गेला तर? नक्कीच भारतातील लोकशाहीला ग्रहण लागेल. सर्वच स्तंभांना खास करून या चौथ्या स्तंभाला धोका देणारा पंचम स्तंभ (किंवा अंतर्गत शत्रू) म्हणजे अशा लोकांचा समूह जो एखाद्या राष्ट्राला आतून कमकुवत करत शत्रू राष्ट्राला मदत करण्यासाठी सतत उघडपणे किंवा गुप्तपणे प्रयत्नशील असतो. फेक नॅरेटिव्ह पसरवणे, धर्माधर्मात, जातीजातीत कलह निर्माण करणे. हे सर्व करण्याची कारणे; देशद्रोही वृत्ती, आपल्या कट्टर धर्माचा टोकाचा दुरभिमान आणि त्याकरिता वाट्टेल ते करण्याची तयारी, सत्ता मिळवण्यासाठी हपापलेले सत्तापिपासू, धन, संपत्ती, पैसा, विकृत विलासिता, ऐशोआराम भोगण्याची लालसा, हे आधीपासून होते. यात आता सहजसाध्य सोशल मीडिया, व्हॉट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर आणखी बरेच काही, त्यात भरीस भर

## वाचक पत्रे

सत्य असत्य यातील धूसर अंतर मिटवणारे आता एआय. आपण पाहत आहोत काही दिवसांपूर्वी झालेल्या दिल्ली बॉम्बस्फोटाच्या घटनास्थळावर जाऊन वृत्तवाहिन्यांचे लोक गाडीचा एखादा भाग, कुणाचा तरी तुटून पडलेला हात, कान, उचलून दाखवत आहेत हे परिस्थितिजन्य पुराव्यांचं नष्ट करणं नाही का? राष्ट्रप्रेमी जनहो, हीच वेळ आहे या पंचम स्तंभाला छेद देण्याची. सत्य लोकांपर्यंत पोचवण्याची, अशी घटना पुन्हा घडणार नाही याची खबरदारी घ्यायची. आपल्या शीर्षस्थ नेतृत्वावर, सरकारी यंत्रणांवर विश्वास ठेवा.

**रवी वाघमारे**/नागपूर

### तरुण भारतचा स्तुत्य उपक्रम

तरुण भारतने तुळस लावा, पर्यावरण वाचवा, हा उपक्रम राबविला तो खरोखरच स्तुत्य आहे. आजच्या धावपळीच्या यंत्रयुगात अशा उपक्रमांची अत्यंत आवश्यकता आहे. आपली संस्कृती, त्यासोबतच आपले आरोग्य यांची सांगड घालणारा हा उपक्रम आहे. सुरुवातीला घरोघरी जाऊन तरुण भारतच्या प्रतिनिधी, त्यांच्या पत्नींनी तुळशीची बीजे दिली. त्याची रोपे तयार करवून घेतली. त्यानंतर ती रोपे दान करून त्याची जोपासना करण्याचे कार्य केले. २ ते ५ नोव्हेंबर या कालावधीत तुळशी विवाहासाठी उपयुक्त असणाऱ्या वस्तू एकाच डब्यामध्ये उपलब्ध करून दिल्या. जुन्या पिढीतील मंडळी आजही सर्व सण तुळशी विवाह उत्साहाने साजरे करतात. मात्र, युवा पिढीला या सर्व गोष्टी करायला वेळच नाही. पण, तरुण भारतच्या या उपक्रमामुळे तुळशी विवाह अगदी थाटात यथासांग पार पडला. तुळशी विवाह साहित्यासोबत एक पुस्तक देखील देण्यात आले. त्यात तुळस आरोग्यासाठी किती उपयुक्त आहे, याबाबत माहिती आहे. तुळशीची कथा, मंगलाष्टके सुद्धा या पुस्तकात अंतर्भूत आहेत. विशेष म्हणजे या डब्यावर भगवद्गीतेतील ४ थ्या अध्यायातील १४ व्या श्लोकातील एक चरण लिहिले आहे. नमे कर्मफले स्पृहा, खरंच याचा अर्थ की, तरुण भारतने हे सुंदर कर्म केले आहे. पण, त्याच्या फळाबद्दल कोणतीही आसक्ती ठेवलेली नाही. लोकांनी जर तुळशीची रोपे लावली, त्याची जोपासना केली तर, तरुण भारतला काय फायदा ? लोकांचेच आरोग्य सुधारेल. पर्यावरणातला दूषितपणा कमी होईल. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे संस्कृतीचे रक्षण होईल. यासाठी कोणतीही आसक्ती न ठेवता राबविलेल्या या उपक्रमाबद्दल तरुण भारतला साष्टांग दंडवत!

**रेणुका जोशी**/९९६०४६१८५०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com




बीड शहरातील जुना मोंढा भागात नेहमीच वाहतूक कोंडी होते यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावं लागतं आहे (छाया कृष्णा शिंदे)

# नानाजी देशमुख विद्या मंदिर येथे बाल दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ नोव्हेंबर**

दीनदयाल शोध संस्थान सं चलित नानाजी देशमुख विद्यमंदिर मध्ये आज १४ नोव्हेंबर् पंडीत जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली.सर्वप्रथम् पंडित नेहरुंच्या प्रतिमेचे पुजन आणि दीप प्रज्वलन् करण्यात आले. यावेळी मंचावर मा.सुनंदाताई कुलकर्णी , मा.मोराळे ताई, मा.आरतीताई जोशी, आराध्या मालुरे व चाणक्य रणखांब आदी उपस्थित होते. सर्वप्रथम विद्यार्थानी मनोगत व्यक्त केले.बाल दिनानिमित्त विविध गुणदर्शना चा कार्यक्रम् घेण्यात आला.या मध्ये विद्यार्थ्यांनी भाषणे केली विश्वजीत गुजर, श्राव्या औसेकर, साची पवार, अर्जित बेद्रे, जान्हवी गायकवाड, भार्गवी लांडे, राघव कदम, प्रांजल यादव, श्रेयसी शिरसट , वैष्णवी कुलकर्णी , राजनंदिनी तांबारे गीत,नृत्य,पोवाडा,ऍक्टिंग, लाठी काठी, शिव तांडव स्तोत्र, इत्यादि कार्यक्रम सादर झाले.

गणपती उत्सवानिमित्त आपल्या शाळेत काही स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते बाल दिनानिमित्त त्या बक्षिसांचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये गणपती स्तोत्र स्पर्धा, दुर्वाची जूडी स्पर्धा , गणपतीची नावे, रंगभरण स्पर्धा व जिलेबी खाणे स्पर्धा इत्यादी. विद्यार्थ्यांसाठी स्नेहलताई गोसावी व मधुराताई यांनी गीताचे सादरीकरण केले गीताचे बोल होते बच्चे मन के सच्चे व क्रांती पोरवाल ताईंनी या लाडक्या मुलांनो हे गीत सादर केले. वैष्णवी ताई कदम यांनी विद्यार्थ्यांना माहिती सांगितले.अध्यक्षीय समारोपात सुनंदा ताईंनी मुलांना शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले. व शेवटी खाऊ वाटप करण्यात आला.अशा प्रकारे हा कार्यक्रम उत्साहात व आनंदात पार पडला. जन शिक्षण संस्थान बीड च्या असिस्टंट ड्रेस मेकर बॅच मधील प्रशिक्षणार्थी तर्फे नानाजी देशमुख विद्या मंदिर मधील सर्व विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी खेळाचे साहित्य दिलेले आहे. सूत्रसंचालन शितलताई कुलकर्णी व अनिताताई मोकाशी तसेच आभार सोनसाळे ताई व श्री बिक्कड यांनी मानले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# दिवसा घरफोडी करणारा आरोपी जेरबंद, दोन घरफोडीचे गुन्हे उघडकीस स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ नोव्हेंबर**

दिनांक १४..११.२०२५ रोजी पोलीस ठाणे बीड ग्रामीण गु.र.नं ३९०/२०२५ कलम ३३१ (१) ईतर बी.एन.एस प्रमाणे यातील फिर्यादीनामे युवराज शाहुराव चव्हाण याचे तक्रारीवरुन गुन्हा नोंद करण्यात आला होता. तसेच दिनांक १२.११.२०२५ रोजी पोलीस ठाणे पिंपळनेर गु.र.नं ३१७/२०२५ कलम ३३१ (३) बी.एन.एस प्रमाणे यातील फिर्यादी अनिल भानुदास काळे याचे तक्रारीवरुन दिवसा घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. वरील घरफोडीचे गुन्हयांचे अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने कसोशीने प्रयत्न सुरु केले होते.

आज दिनांक १५/११/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्तबातमीदारामार्फत माहीती मिळाली की वरील दोन्ही गुन्हे आरोपी नामे अमोल गणेश रांजवन रा माळेगल्ली बीड व आकाश भोसले या दोघांनी मिळून केली आहे. त्या पैकी अमोल गणेश रांजवन हा त्याचे घरासमोर मोटार सायकलवर बसलेला आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावरुन पोलीस निरीक्षक श्री शिवाजी बंटेवाड यांनी तात्काळ पोलीस उपनिरीक्षक श्री श्रीराम खटावकर यांची टिम रवाना केली. नमुद बातमीचे ठिकाणी स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी सदरील ठिकाणी गेले असता अमोल रांजवन हा त्याचे घरासमोर मोटार सायकलवर बसलेला दिसुन आला त्यास ताब्यात घेवुन त्याचे नांव गांव विचारले असता त्यानी त्याचे नांव अमोल गणेश रांजवन वय ३५ वर्ष, रा माळेगल्ली बीड असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे पिंपळनेर येथे केलेल्या दिवसा घरफोडी बाबत विचारपुस केली असता त्याने सदरील घरफौडी त्याचा मित्र आकाश भोसले रा शिवाजीनगर या दोधांनी मिळुन केल्याचे सांगीतले. त्यास अधिक चौकशी केली असता त्याने पोलीस ठाणे बीड ग्रामीण गु.र.नं ३९०/२०२५ कलम ३३१(१) बी.एन.एस हा देखील गुन्हा केल्याचे कबुली दिली व या मध्ये चोरीस गेलेल्या मालापैकी ९६००० रु सोन्याचे दागीणे व गुन्हयात वापरलेली मोटार सायकल अशी एकुण १,४६,०००/- रु मुद्देमाल जप्त करुन आरोपी व मुद्देमाल पुढील तपासकामी पोलीस ठाणे पिंपळनेर याचे ताब्यात देण्यात आला आहे.



सदरील कामगिरी हि श्री नवनित कॉंवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, श्री शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार राहुल शिंदे, सोमनाथ गायकवाड, पोलीस अंमलदार आश्पाक सय्यद, मनोज परजणे चालक पोलीस हवालदार नितीन वडमारे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे.

# यशवंतराव चव्हाण स्मृती समिती, अंबाजोगाई ४१ व्या यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे अंबाजोगाईत आयोजन

डॉ. कमलताई गवई, श्रीकांत देशमुख, डॉ.अशोक ढवण, यांच्या उपस्थित व पं. मुकेश जाधव यांचे तबला वादन व कृष्णा बोंगाणे यांच्या स्वरांनी मैफल रंगणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ नोव्हेंबर**

यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने दरवर्षी आयोजित केल्या जाणार्या यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे यावर्षी ४१ वे वर्ष असून तीन दिवसीय कार्यक्रमात उद्घाटन समारंभ, कवी संमेलन, सुगम संगीत, शालेय चित्रकल व बाल आनंद.मेळावा, शेतकरी परिषद, शास्त्रीय संगीत कार्यक्रम, यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार वितरण, समारोप समारंभ असा संपन्न होणार आहे.

अंबाजोगाईत गेल्या ४० वर्षांपासून सातत्याने यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने वैविध्यपुर्ण, वैचारिक, वाङ्मयीन, सांगितीक, सांस्कृतिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार, कृषिविषयक प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा व प्रदर्शन तसेच ग्रंथ प्रदर्शन असे विविध कार्यकम आयोजित केले जातात. अंबाजोगाई व मराठवाड्याचा सांस्कृतिक, सामाजिक, साहित्यिक, वैचारिक वारसा जोपासण्याचा व दृढ करण्याचा प्रयत्न केला जातो. यावर्षी ४१ वा यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह दि.२५, २६ व २७ नोव्हेंबर मंगळवार, बुधवार व गुरुवार असा संपन्न होणार आहे अशी माहिती समितीचे सचिव दगडू लोमटे यांनी दिली.



उद्घाटन व कवी संमेलन

मंगळवार, दि.२५ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५. ३० वा. या समारोहाचे उद्घाटन नांदेड येथील साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त प्रसिद्ध लेखक श्रीकांत देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

रात्रौ ८.३० वा. कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून अध्यक्षस्थानी नांदेड येथील येथील ज्येष्ठ कवी प्रा.डॉ. पी. विठ्ठल हे राहणार असून, कवी संमेलनाचे सूत्रसंचालन घाटनांदूर येथील सुप्रसिद्ध कवी अविनाश भारती करणार आहेत. तर सुप्रसिध्द कवी सर्वश्री शरद धनगर-अमळनेर, पुनीत मातकर-यवतमाळ, अनंत राऊत-अकोला, डी.की. शेख- धाराशिव, लता ऐवळे कदम-सांगली, अविनाश काठवटे- छत्रपती संभाजीनगर, गुंजन पाटील- सोयगाव, गजानन मते-अमरावती, सुनील उन्हाळे-छत्रपती संभाजीनगर , सय्यद चांद तरोडकर- परभणी व आत्माराम जाधव-गंगाखेड यांचा सहभाग राहणार आहे.

बुधवार, दि.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ८ वाजता ८ वी ते १० वी शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित केली आहे. सकाळी १०.३० वाजता बाळ आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून त्यातच चित्रकला स्पर्धा विजेत्यांना बक्षीस वितरण केले जाईल. सुप्रसिद्ध साहित्यिक विठ्ठल जाधव-शिरूर कासार हे अध्यक्षस्थानी उपस्थित राहणार असून अंबाजोगाई येथील प्रसिद्ध चित्रकार त्र्यंबक पोखरकर हे पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.यावेळी ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.

# विशाल जाजू यांची राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या बीड जिल्हा उपाध्यक्ष पदी नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१५ नोव्हेंबर**

राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या बीड जिल्हा उपाध्यक्ष पदी अंबाजोगाई शहराचे युवा नेतृत्व विशाल विजयकुमार जाजू यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष ऍड राजेश्वर चव्हाण यांनी राजकिशोर मोदी यांच्या शिफारशीनुसार विशाल जाजू यांना त्यांची बीड जिल्हा उपाध्यक्ष पदी नियुक्ती केल्याचे नियुक्तीपत्र राजकीशोर मोदी यांच्या हस्ते नुकतेच देण्यात आले. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष ना अजितदादा पवार यांचे व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे विचार बीड जिल्ह्यातील तळागाळातील नागरिकांपर्यंत पोचविण्यासाठी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या आदेशानुसार बीड जिल्हा अध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांनी सदरील नियुक्ती केली आहे.



विशाल जाजू हे माजी नगराध्यक्ष स्व विजयकुमार जाजू यांचे सुपुत्र असून त्याचा शहरातील सामाजिक , सांस्कृतिक क्षेत्रात मोठ्या हिरीरीने सहभाग दिसून येतो. अंबाजोगाई शहर तथा पंचक्रोशीत स्व विजयकुमार जाजू यांचा दांडगा जनसंपर्क होता. अंबाजोगाई शहरातील अनेक कुटुंब स्व विजयकुमार जाजू यांनी वसवली व स्थिरावली आहेत. विजयकुमार जाजू यांची व त्यांच्या कार्याची उजळण आजही अंबाजोगाई शहरात केल्या जात आहे. जाजू घराण्याची पुण्याई आजही त्यांच्या परिवारास मोठा आदर्श घालून देत आहेत. तीच परंपरा त्यांचे सुपुत्र विशाल जाजू हे पुढे चालवत आहेत.अंबाजोगाई शहरात राष्ट्रवादी कॉंग्रेस व राजकिशोर मोदी यांना मानणारा मोठा वर्ग आहे. राजकिशोर मोदी यांचा अंबाजोगाई नगर परिषदेच्या माध्यमातून झालेला जनसंपर्क व विशाल जाजू यांचा कौटुंबिक वारसा हा अंबाजोगाई नगर परिषदेच्या निवडणुकीत मोठा करिष्मा दाखवू शकतो. महाराष्ट्र शासन व राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध शासकीय व लोकाभिमुख योजना सामान्य मतदारांपर्यंत पोचविण्यासाठी आपण प्रयत्न करावेत अशी अपेक्षाही विशाल जाजू यांच्या कडून पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. विशाल जाजू यांची बीड जिल्हा उपाध्यक्ष पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

# ‘स्वयमेव मृगेन्द्रता’ लाभलेल्या डॉ.मयूर सावंत यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, शहरअध्यक्षपदी निवड!

## जय किसान मंडळाकडून अभिनंदन; उद्योजकतेसह समाजसेवेतील योगदानाचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.१५ नोव्हेंबर**

उद्योग जगतात मोठे यश संपादन करण्यासोबतच, समाजसेवा आणि प्रबोधनाच्या माध्यमातून समाजात परिवर्तन घडवणाऱ्या डॉ. मयूर सावंत यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या (NCP) शहरअध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या महत्त्वाच्या निवडीबद्दल जय किसान मंडळाने हार्दिक शुभेच्छा दिल्या असून, एक अत्यंत कर्तृत्ववान, कणखर व निर्भीड नेतृत्व पक्षाला मिळाले असल्याच्या भावना व्यक्त केल्या आहेत.

डॉ.सावंत यांचे व्यक्तिमत्त्व केवळ एका यशस्वी उद्योजकापुरते मर्यादित नाही. समाजहिताची कळकळ, व्यवस्थेवर कोरडे ओढण्याची निर्भीडता, प्रबोधनाची आग्रही भूमिका आणि नवतंत्रज्ञान स्वीकारण्याची तयारी यामुळे त्यांची समाजसेवा अधिक सखोल ठरली आहे. त्यांच्या जीवनप्रवासात या गुणांची अनेक उदाहरणे आढळतात.



‘स्वयमेव मृगेन्द्रता’ हे समर्पक वर्णन जय किसान मंडळाने डॉ. मयूर सावंत यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करताना, ’स्वयमेव मृगेन्द्रता’ हे शब्द वापरले. ज्याप्रमाणे वनामध्ये सिंहाला कोणी राज्याभिषेक किंवा संस्कार करत नाही; तो आपल्या अंगभूत पराक्रमाच्या जोरावर ’मृगेन्द्र’ हे स्थान प्राप्त करतो, त्याचप्रमाणे डॉ. सावंत यांनी आपले साहस आणि बळ कमावत वाटचाल केली आहे. मजबूत, बुलंद आणि अभंग ध्येय उराशी बाळगणारे, कणखर, निर्भीड, निःपक्ष, निःस्वार्थी, निरपेक्ष आणि विजिगीषू वृत्तीचे ते अमर्याद कर्तृत्वाचे स्वयंभू धनी आहेत.

त्यांच्या या गुणांमुळे आणि समाजकार्यातील योगदानामुळे, पक्षसंघटनेत ते एक प्रभावी आणि महत्त्वाचे काम करतील, असा विश्वास जय किसान मंडळाने व्यक्त केला आहे.



# शाश्वत शेती-समृद्ध शेतकरी अभियानांतर्गत निलंगा तालुक्यात प्रक्षेत्र भेट

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, १५ नोव्हेंबर :** शाश्वत शेती-समृद्ध शेतकरी या अभियानांतर्गत शुक्रवार दि. १४ नोव्हेंबर रोजी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली निलंगा तालुक्यातील विविध गावांमध्ये आज प्रक्षेत्र भेट व मासिक चर्चासत्र संपन्न झाले.

या दौऱ्यात तालुक्यातील तूर, हरभरा, ज्वारी यांसह केळी, पपई, पेरू, सीताफळ, ड्रॅगनफ्रूट या फळबागांची पाहणी करून शेतकऱ्यांच्या अडचणी जागेवरच सोडविण्यात आल्या. मांजरा कृषी संशोधन केंद्राचे डॉ. सचिन डिग्रसे व कृषी विस्तार विद्यावेत्ता डॉ. वसंतराव सूर्यवंशी यांनी रोगग्रस्त झाडांचे निदान, प्रतिबंधात्मक उपाय, खत व्यवस्थापन, सिंचन तंत्र आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पीक पद्धतीत सुधारण्याबाबत मार्गदर्शन केले. निलंगा उपविभागीय अधिकारी शरद झाडके यांनी प्रतिकूल



परिस्थितीतही उत्कृष्ट फळबागा आणि आधुनिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे कौतुक केले.

यावेळी बोलताना ते म्हणाले, विद्यापीठाने ठरवून दिलेल्या हेक्टरी उत्पन्नापेक्षा जास्त उत्पादन निलंगा तालुक्यातील शेतकरी घेत आहेत. हवामान बदलाचा विचार करून पीक पद्धती बदलणे अत्यावश्यक असून शाश्वत शेतीकडे वाटचाल करण्याची गरज आहे. तूर, हरभरा, ज्वारी, कांदा पिकांची स्थिती केळी, पपई, पेरू, सीताफळ, ड्रॅगनफ्रूट, फळबागांचे निरीक्षण, रोगनियंत्रण, खत नियोजन, सिंचन व्यवस्थापन, शेततळे व सेंद्रिय पद्धतींचा आढावा प्रक्रिया केंद्र, गुळ पावडर, काजू प्रक्रिया युनिटची पाहणी करण्यात आली.

या भेटीदरम्यान पथकाने तालुक्यातील गौर, हणुमंतवाडी मुगाव, केळगाव, निलंगा, अनसरसवाडी, हलगरा, वळसांगवी, कलांडी, अनसरवाडा येथील २ हजार मेट्रिक टन क्षमतेचे गोडाऊन तसेच राज्य कृषी यांत्रिकीकरण योजने तुन घेतलेले किसान ड्रोन याची पण पहाणी केली.

यावेळी डॉ. सचिन डिग्रसे- मांजरा कृषी संशोधन केंद्र, डॉ. वसंत सूर्यवंशी - कृषी विस्तार विद्यावेत्ता,

तालुका कृषी अधिकारी, नाथराव शिंदे - निलंगा, सचिन बावगे - अहमदपूर, नितीन कांबळे - रेणापूर, शिवचंद्र पाल जाधव - चाकूर, प्रमोद राठोड - लातूर, दत्तात्रेय हाके - औसा, संदीप वळकुंडे - उदगीर, संजयकुमार ढाकणे - शिरूर अनंतपाळ, कृष्णा मुंडे - देवणी, कृषी पर्यवेक्षक - सुनील घारुळे, वाघमारे, येवले, कदम, साहेबराव सोनकांबळे या प्रक्षेत्र भेटीत शेतकऱ्यांच्या विविध शंकांचे समाधान करत आधुनिक शेतीतून अधिक उत्पादन घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन देण्यात आले.



## लालबहादूर शास्त्री विद्यालयात बिरसा मुंडा जयंती उत्साहात

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १५ नोव्हेंबर :** लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात बिरसा मुंडा जयंती उत्साहात संपन्न झाली. याप्रसंगी व्यासपीठावर उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर, प्रमुख पाहुणे राहुल नेटके, मनिषा आचार्य, मंजुषा रुद्रवार, स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शंकरराव लासुणे, ॲड. शिवाजीराव बिराजदार, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले, बिरसा मुंडा यांच्यावेशभुषेत सौम्यक जोंधळे मयंक अनंतवाळ उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे राहुल नेटके यांनी आजचा दिवस जनजाती गौरव दिन म्हणून साजरा केला जातो.आदिवासी जमाती फार प्राचीन काळापासूनची जमात आहे भारतीय संस्कृती, कला यांचे जतन व पर्यावरणाचे संरक्षण करणारी ही जमात असून बिरसा मुंडा यांनी आदिवासींना ब्रिटिश सत्तेच्या शोषणापासून वाचवण्यासाठी लढा दिल्याचे सांगितले. मनिषा आचार्य यांनी बिरसा मुंडा यांच्या कार्याची माहिती दिली तर मंजुषा रुद्रवार यांनी बिरसा मुंडा यांचा धगधगता संघर्षमय इतिहास विद्यार्थ्यांसमोर मांडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रास्ताविक व आभार विद्यार्थ्यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनिता येलमटे, निलेश मांडवकर, लक्ष्मी चव्हाण यांसह व्यवस्थेतील सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले.

# स्थानिक स्वराज्य संस्थेत काँग्रेसचा झेंडा फडकवणार : साळुंके

## बाळासाहेब सूर्यवंशी हलकीकर यांचा भाजपातून काँग्रेस प्रवेश

**त.भा. वृत्तसेवा**

**निलंगा, १५ नोव्हेंबर :** निलंगा विधानसभा मतदारसंघातील बाळासाहेब सूर्यवंशी हलकीकर यांनी मोठे शक्ती प्रदर्शनाने दोनशे वाहनांच्या ताफ्यासह शेकडो कार्यकर्त्यांसह शुक्रवार दिनांक १४ नोव्हेंबर रोजी निलंगा येथे भाजपातून काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

यावेळी प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांचे स्वागत करताना काँग्रेसचे लातूर जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे म्हणाले, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नगरपरिषद, नगरपंचायत, जिल्हा परिषद, व पंचायत समिती निवडणुकीत कार्यकर्त्यांच्या बळावर काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकवणार असल्याचे ग्वाही दिली.

या पक्षप्रवेशावेळी जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे, डॉ. अरविंद भातांब्रे, शिरूर अनंतपाळ तालुका अध्यक्ष बाबासाहेब पाटील उजेडकर, सुधाकर पाटील, तिरुपती शिंदे,, बालाजी गोमसाळे, विठ्ठल पाटील, गोविंद सूर्यवंशी, अंबादास जाधव आदी उपस्थित होते. यावेळी बाळासाहेब सूर्यवंशी हलकीकर यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपमधून काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केले.

**वाहनांच्या ताफ्याने शहरवासियांचे लक्ष वेधले**

काँग्रेस पक्षात प्रवेश करण्यापूर्वी बाळासाहेब सूर्यवंशी हलकीकर यांनी निलंगा शहरातील मुख्य रस्त्यावरून काढलेल्या दोनशे वाहनांच्या ताफ्याने शहरवासियांचे लक्ष वेधून घेतले. शहराच्या मुख्य रस्त्यावरून २०० वाहनांच्या रांगामुळे शहरात थोड्या वेळासाठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.



यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे यांनी सत्ताधारी भाजप आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्यावर पदाचा गैरवापर करून विकास कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला असल्याची टीका केली. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीत गटातटाचे राजकारण न करता काँग्रेस पक्षाच्या सामान्य कार्यकर्त्याला सत्तेत येण्यासाठी बळ देणार असल्याचे सांगत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# बिहार विजयाचा औशात जल्लोष

**त.भा. वृत्तसेवा**

**औसा, १५ नोव्हेंबर :** बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएला २४३ पैकी २०० पेक्षा अधिक जागा मिळाल्या.या भव्य विजयाचा जल्लोष औशात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



औसा नगरपालिकेतही 'कमळ' फुलणारच - डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर

शहरातील भाजप कार्यकर्त्यांनी फटाके फोडून ढोल-ताशांच्या गजरात जल्लोष व्यक्त केला. या आनंद सोहळ्यात आमदार अभिमन्यू पवार आणि अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या हस्ते पेढे वाटून विजयाचा आनंद कार्यकर्त्यांनी आणि नागरिकांनी साजरा केला.

अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या, बिहारच्या विजयाचा जल्लोष आपण साजरा करतो आहोत. मात्र हा उत्सव इथंच थांबणार नाही. औसा नगरपालिकेतही आपल्या विजयी भगव्या काफिल्याचा जल्लोष लवकरच सर्वत्र दिसेल. जनता विकासाला मत देते आणि औशाची जनता निश्चितच विकासाचा मार्ग निवडेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

आ.अभिमन्यू पवार म्हणाले, विकासाच्या बळावर भाजपा औसा नगरपालिकेत सत्ता स्थापन करणार आहे. बिहारमधील जंगलराजला पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नितीशकुमार यांनी पूर्णविराम दिला. त्याचप्रमाणे औशातील जनता येथे असलेला जंगलराज संपवेल.असा विश्वास आ. पवार यांनी व्यक्त केला.

बिहारच्या विजयानंतर उत्साहाचे वातावरण पसरले असून औसा शहरासह तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये आगामी नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी आत्मविश्वास जाणवत आहे. शहरातील प्रमुख चौक, कार्यालये आणि कार्यकर्त्यांच्या भेटीगाठींमधून निवडणुकीची रंगत आणि विजयाची चाहूल स्पष्टपणे जाणवत आहे. याच विजयाचा फायदा आगामी नगरपालिका निवडणुकीत दिसून येणार आहे. यावेळी मोठ्या प्रमाणात पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# डॉ. विजय भटकर यांची विश्वेश्वर संकुलास ऐतिहासिक भेट



**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, १५ नोव्हेंबर :** भारतातील संगणक तंत्रज्ञानाचे पद्मभुषण, महाराष्ट्र भुषण डॉ. विजय भटकर यांनी औसा तालुक्यातील आलमला येथील विश्वेश्वर शैक्षणिक संकुलास भेट दिली. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या व्यक्तीमत्वाने ग्रामीण भागातील संस्थेला भेट दिल्यामुळे संस्थेच्या इतिहासातील हा ऐतिहासीक क्षण ठरला असून या भेटीतील मार्गदर्शनामुळे या संकुलातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला नवी दिशा मिळणार आहे.

संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, प्राचार्य प्रशांत धाराशिवे, डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, डॉ. कैलास कापसे, प्रशासकीय अधिकारी योगेश धाराशिवे, शिरीष उटगे, अशिष उटगे उपस्थित होते.

डॉ. विजय भटकर म्हणाले, महाराष्ट्रातील एक आदर्श संस्था म्हणुन विश्वेश्वरय्या संस्था उभी रहावी आशी माझी इच्छा आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी जिद्द व प्रामाणिक परिश्रमाच्या जोरावर जगाच्या पातळीवर यश संपादन करू शकतात. यासाठी या संस्थेने दिलेल्या संधीचा वापर करून विद्यार्थ्यांनी यश मिळवावे, असे आवाहन डा. भटकर यांनी केले. त्यांच्या या आव्हानाने उपस्थित विद्यार्थ्यांच्या मनात नवा आत्मविश्वास निर्माण झाला.

यावेळी शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, डॉ. सुरज मालपाणी, प्रा. मयुरी चंद्रवंशी व्दारा लिखीत पुस्तकाचे प्रकाशन डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. अंकुश बिडवे यांनी तर आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे यांनी केले.

**तपपुर्तीला अखेर यश मिळाले : धाराशिवे**

विश्वेश्वरय्या इन्स्टिट्यूट आफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नालाजी महाविद्यालयाने ठेवलेल्या टेक्निकल इव्हेंन्टसाठी १२ वर्षापासून सातत्यपुर्ण पाठपुरावा केला. यानंतर डॉ. विजय भटकर यांनी विश्वेश्वरय्या संकुलास भेट दिली. यामुळे तपपुर्तीला आखेर यश मिळाले. तर संस्थेच्या आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला नवी दिशा व नवी गती मिळाली. असे मत संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे यांनी यावेळी व्यक्त केले.

# रसिका महाविद्यालयात म्हेत्रे यांचे व्याख्यान संपन्न

**त.भा. वृत्तसेवा,**

**देवणी, १५ नोव्हेंबर :** येथील कै. रसिका महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कक्षा अंतर्गत नुकतेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगमार्फत राजपत्रित अधिकारी वर्ग-१ पदी निवड झालेले बोरोळ येथील रहिवाशी आकाश नामदेवराव म्हेत्रे यांचा सत्कार समारोह आणि स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी? या विषयावर व्याख्यान हा कार्यक्रम संपन्न झाला. जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातच आपले ध्येय निश्चित करुन त्याप्रमाणे मार्गक्रम करणे आवश्यक असते. मेहनतीला पर्याय नाही.

यश प्राप्त करण्यासाठी माणसाची गरिबी, जात, धर्म, परिस्थिती या गोष्टी आडव्या येत नसतात. फक्त योग्य दिशा ठरवून त्याप्रमाणे अहोरात्र प्रयत्न करावे लागतात असे आकाश म्हेत्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले. तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी? यावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन देवणी शहरातील सोन्या चांदीचे सुप्रसिद्ध व्यापारी कालिदास देवणे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव गजानन भोपणीकर होते.

यावेळी रसिका महाविद्यालयाचे प्राचार्य चंद्रकांत जावळे पाटील, उपप्राचार्य शिवाजी सोनटक्के, शिवाजीराव बिरादार, अभंगराव निटुरे, युवा उद्योजक दत्ता हुरुचनाळे, प्रताप कोयले, सत्यदेव गरड, श्रीकांत बिरादार, अंकुश माने, प्रीतम आष्टूरे, ईश्र्वर पाटील,



आबासाहेब इंग्लिश स्कूलचे प्राचार्य भट, उपप्राचार्य रामदास नागराळे, रसिका महाविद्यालय आणि आबासाहेब इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य तथा ग्रंथपाल डॉ. शिवाजी सोनटक्के यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी माने यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. प्रशांत भंडे यांनी केले.

# प्रा. पांडुरंग मुट्ठे संपादित ग्रंथाचे प्र. कुलगुरू डॉ. महाजन यांच्या हस्ते प्रकाशन




**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, १५ नोव्हेंबर :** येथील शिवनेरी महाविद्यालयाचे समाजशास्त्र विभाग प्रमुख तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. पांडूरंग मुठ्ठे यांनी संपादीत केलेल्या 'भारतीय समाज : संरचनात्मक बदल आणि सामाजिक समस्याया ग्रंथाचे प्रकाशन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र. कुलगुरु डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते दि. ४ नोव्हेंबर २५ रोजी विद्यार्थी व समाजशास्त्र विषयाच्या प्राध्यापकासाठी उपयुक्त ठरणाऱ्या ग्रंथाचे विद्यापीठामध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून करण्यात आले.

यावेळी विद्यापीठाचे विशेष कार्यासन अधिकारी दिगांबर नेटके, रासेयोचे संचालक डॉ. मारोती गायकवाड, समाजशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ. एस. पी. घायाळ, शाहजानी औरादचे समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विनोद जाधव, लेखक डॉ. नाथराव मोरे, प्रा. डॉ. महानंदा राऊत खेडकर मॅडम व डॉ.मा.मा. गायकवाड यांची उपस्थिती होती.

# मुलींना स्वसंरक्षणाचे कौशल्य आत्मसात करणे आवश्यक : सरवदे

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १५ नोव्हेंबर :** येथील विद्यावर्धिनी विद्यालयात इनरव्हील क्लबच्या वतीने मुलींसाठी स्वसंरक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेला मार्गदर्शक शिक्षक विशाल सरवदे सरांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षण करण्यासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सुषमा पाटील यांची उपस्थिती होती.

प्रत्येक विद्यार्थिनीने ही कौशल्ये आत्मसात करणे ही आजच्या काळाची खरी गरज आहे. धोक्याच्या वेळी सुरक्षित अंतर राखणे आणि वेगाने प्रतिसाद देणे शिकणे आवश्यक आहे. यासाठी याचे आयोजन केले होते. ललिता किनगावकर यांनी कॅन्सर प्रतिबंधात्मक लसीकरण एचपीव्ही व्हायरस याबाबत माहिती दिली. विशाल सरवदे यांनी कराटे डेमोद्वारे विद्यार्थ्यांना सेल्फ डिफेन्स ही केवळ शारीरिक कला नसून ती आत्मविश्वास, स्वाभिमान आणि स्वावलंबनाचे प्रतिक आहे.

वेगवेगळ्या कृतीतून व प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून माहिती दिली. ही कार्यशाळा ९ ते १४ वयोगटातील विद्यार्थिनींसाठी घेण्यात आली. या कार्यशाळेस इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा पूजा रेड्डी, रजनी महाजन, ललिता किनगावकर, विजया भसारे व कलावती भातांब्रे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक सौ. सुषमा पाटील यांनी, तर सुत्रसंचालन कैवल्या नलवाड यानी केले. शेवटी सौ. कलावती भातांब्रे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



## संक्षिप्त वृत्त...

### शेतीला पूरक व्यवसायाची गरज; मुरघास निर्मितीकडे शेतकऱ्यांनी वळावे : कृषी विकास अधिकारी सामाले यांचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी :** सध्याच्या काळात शेतीला पूरक व्यवसाय असणे गरजेचे आहे. हा जोड व्यवसाय असेल तर शेतकरी अडचणीत येणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी आता शेतीपूरक व्यवसायाकडे वळावे विशेषतः मुरघास युनिट टाकावे किंवा घरच्या घरी मुरघास तयार करावा असे आवाहन कृषी विकास अधिकारी दीपक सामाले यांनी केले.

पाथरी तालुक्यातील बांदरवाडा येथे जिल्हा परिषद व पंचायत समिती कृषी विभागातर्फे गुरुवार १४ नोव्हेंबर रोजी 'सेंद्रिय तथा शाश्वत शेती व शेती पूरक व्यवसाय' या विषयावर कृषी मेळावा व परिसंवाद कार्यक्रम पार पडला, यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी गोविंद कोल्हे, पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ. भाग्येश बशेट उपस्थित होते. यावेळी गोविंद कोल्हे, डॉ. भाग्येश बशेट, बालासाहेब गायकवाड, नंदा गायकवाड यांनी सेंद्रिय शेती, शेती पूरक व्यवसाय, पशुधन विभाग योजना याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी गावचे सरपंच, सदस्य, पोलिस पाटील व बहुसंख्येने शेतकरी, महिला उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कृषी विस्तार अधिकारी संदिपान घुंबरे, श्रीमती ए. पी. जोशी आदींनी परिश्रम घेतले.

### 'रायरेश्वर'च्या दोन विद्यार्थीनींची राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** क्रीडा व सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या विभागीय मैदानी स्पर्धेत धर्मापुरी येथील रायरेश्वर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयातील श्रीशा सुनीलराव देशमुख हीने ४ किमी डिव्हिजन क्रॉस कंट्रीमध्ये तिसरा तर पुनम भगवानराव तिथे हीने चौथा क्रमांक पटकावला असून त्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी पात्र ठरल्या आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्था अध्यक्ष तथा प्राचार्य किरण सोनटक्के व संस्था सचिव तथा प्राचार्य सौ. शितल सोनटक्के यांच्यासह सर्व समन्वयक, विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी खेळाडूंचे व प्रशिक्षक मार्गदर्शकाचे अभिनंदन केले असून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### नितीन लोहट यांचा देहराडून ते परभणी शेकडो किलोमीटरचा सायकल प्रवास : जिजाऊ आयटीआयमध्ये मुलाखत : प्रवासातील प्रेरणादायी अनुभव, आव्हाने आणि सामाजिक संदेश यांवर सखोल चर्चा

**परभणी,/प्रतिनिधी:** देहराडून ते परभणी हा धडाडीचा सायकल प्रवास पूर्ण करून आलेले संस्थेचे सचिव नितीन लोहट यांची विशेष मुलाखत जिजाऊ आयटीआय येथे आयोजित करण्यात आली होती. या मुलाखतीत प्रवासातील प्रेरणादायी अनुभव, आव्हाने आणि सामाजिक संदेश यांवर सखोल चर्चा झाली.

कार्यक्रमाची प्रस्तावना आयटीआयचे प्राचार्य ज्ञानेश्वर तरवटे यांनी केली. त्यांनी अशा धाडसी उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नवे उमेदीचे विचार निर्माण होतात, आत्मविश्वास वाढतो व साहसी प्रवृत्तीला चालना मिळते, असे सांगत पाहुण्यांचे स्वागत केले. मुलाखती मधील प्रश्नोत्तरांच्या रोचक शैलीमुळे संपूर्ण कार्यक्रमाला रंगत आली. प्रवासातील रोचक किस्से, अपघातांपासून सुटका, पर्वतीय प्रदेशातील थंडी, दीर्घ मैलांचा रोजचा प्रवास यावर आलेले अनुभव नितीन लोहट यांनी सांगितले.

मुलाखतीत गट निदेशक जाधव यांनी या सायकल प्रवास कार्यक्रमा मागील प्रेरणा, नियोजन आणि टीमवर्क याबाबत माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांना अशा उपक्रमांमधून सकारात्मक जीवनमूल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व निदेशकांनी, विद्यार्थी यांनी मेहनत घेतली. या संपूर्ण मुलाखतीत प्रवासाची धडाडी, प्रश्नोत्तरांची बुद्धिमत्ता आणि प्रेक्षकांचा उत्कट सहभाग यामुळे कार्यक्रमाला अधिकच रंगत आली.

### विद्यार्थ्यांनी विज्ञाननिष्ठ दृष्टी व शिस्तीतून भविष्य घडवावे : व्यंकटेश तोरंबेकर

**परभणी,/प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांनी विज्ञाननिष्ठ दृष्टी, शिस्त आणि प्रामाणिक प्रयत्न यांच्या जोरावर उज्ज्वल भविष्य घडवावे, असे आवाहन नूतन विद्या समितीचे संचालक व्यंकटेश तोरंबेकर यांनी केले.

येथील एन. व्ही. एस. मराठवाडा प्राथमिक शाळेत पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे संचालक तोरंबेकर उपस्थित होते. आपल्या मनोगतात त्यांनी पंडित नेहरूंच्या राष्ट्रनिर्मितीतील अविस्मरणीय योगदानाची प्रभावी उजळणी केली. मुलांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व आणि विकास हा चाचा नेहरूंच्या विचारांचा केंद्रबिंदू असल्याचे सांगून, विद्यार्थ्यांनी त्यांच्या आदर्शांचे अनुकरण करावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून पवन जाधव यांनी विद्यार्थ्यांना चाचा नेहरूंच्या आदर्शांनी प्रेरित होऊन प्रगतीचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल माने यांनी तर आभार प्रदर्शन दीपक बन यांनी केले.

# उमेदवारीच्या स्पर्धेत आयाराम-गयारामच आघाडीवर, निष्ठावानांच्या हातात फक्त झेंडाच

**मोहन धारासूरकर**

**परभणी,/प्रतिनिधी-** सेलू नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदासह २६ सदस्यांच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्षांमधून मोठ्या प्रमाणावर इच्छुकांची उमेदवारी करीता भाऊगर्दी उसळली असून त्यात आयाराम-गयाराम हे आघाडीवर आहेत. त्याचा परिणाम निष्ठावानांना या निवडणूकीत नेहमीप्रमाणे खाद्यांवर झेंडा घेऊनच फिरावे लागेल की काय? असे चित्र आहे.

सेलू नगरपालिकेच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर राजकीय उलथापालथ झाली. त्याचा परिणाम या निवडणूकीवर उमटणार हे स्पष्ट होते. त्याचे कारणच या पालिकेवर सातत्याने वर्चस्व राखणारे माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे यांनी ऐन निवडणूकीच्या तोंडावरच भारतीय जनता पार्टीत समर्थकांसह प्रवेशाचा निर्णय घेतला. त्यामुळेच भारतीय जनता पार्टीत उमेदवारीकरीता मोठ्या प्रमाणावर मारामार होणार हे चित्र दिसून आले होते. त्याप्रमाणेच उमेदवारीच्या या स्पर्धेत पक्षांतर्गत त्या त्या प्रभागातील इच्छुकांच्या भाऊगर्दीमुळे उमेदवाराच्या निवड प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अडथळे उभे राहीले आहेत. ज्येष्ठ नेते माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर व जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ. मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या कट्टर कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पार्टी अंतर्गत निष्ठावान माजी पदाधिकारी व कार्यकर्ते हे या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर महिनोन महिन्यापासून मोर्चेबांधणीत होते. त्यातच बोराडे समर्थकांच्या प्रवेशामुळे उमेदवार निवडीत मोठा पेच उभा राहीला आहे.

नगराध्यक्ष पदाकरीता बोराडे यांचे तीघे समर्थक आरक्षण जाहीर झाल्यापासून दंड थोपाटून आहेत. त्यातच भाजपाचेही दोघे सदस्य पहिलेपासूनच या पदाकरीता रिंगणात आहेत. त्यामुळे नगराध्यक्ष पदाच्या निवडणूकीत नेमकं कोणाला रिंगणात उतरवावे, असा पेच प्रसंग स्थानिक पातळीवरील नेतेमंडळींसमोर उभा राहीला आहे, बोर्डीकर व बोराडे या दोघांमध्ये या बाबत एकमत होईनाचे झाले आहे. नगराध्यक्ष पदाप्रमाणे सदस्यांच्या निवडीतही मोठ्या प्रमाणावर घोळात घोळ सुरु आहे. बोराडे व बोर्डीकर यांचे समर्थक समोरासमोर उमेदवारी करीता दावे-प्रतिदावे ठोकून दंड थोपाटून बसले आहेत. त्यामुळेच भाजपा अंतर्गत उमेदवार निवडीच्या बैठकांचे सत्र व चर्चेचे गुऱ्हाळ गेल्या आठ दिवसांपासून निर्णयाविना रंगले आहे. उमेदवारांच्या भाऊगर्दीमुळेच भाजपाने येथून स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे त्यांचे मित्रपक्ष म्हणजे शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील काही इच्छुक चांगलेच हिरमुसले आहेत. आपणास तडजोडीतून सन्मानजनक जागा मिळतील व महायुतीतून संपूर्ण ताकदिनिशी निवडणूक लढविता येईल या आशेवर हे सारे इच्छुक स्वप्न रंगवू लागले होते. परंतु, उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होवून चार दिवस उलटल्यानंतरसुध्दा अद्यापही नगराध्यक्ष पदासह सदस्यांच्या निवडीबाबत भारतीय जनता पार्टी असो, महाविकास आघाडीतील काँग्रेस, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गट व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटात एकवाक्यता होईनाशी झाली आहे. त्यामुळेच निष्ठावानांना आपणास ऐनवेळी रिंगणाबाहेर रहावे लागणार, अशी भिती वाटत आहे. त्यातच प्रमुख राजकीय पक्षांच्या स्थानिक सूत्रधारांनी उमेदवारी मेरिट बेसवरच दिली जाईल, अशी घोषणा केली असून जो उमेदवार जास्तीत जास्त रक्कम खर्च करु शकेल, त्यास प्राधान्य द्यावयाचा सूर या सूत्रधारांनी आळवल्यानंतर निष्ठावानांसमोर अनेक प्रश्न उभे राहीले आहेत. आयाराम-गयारामच ऐनवेळी उमेदवारीत बाजी मारतील, असे सकृतदर्शनी चित्र आहे.



### माधवराव पाटील महाविद्यालयात बिरसा मुंडा जयंती साजरी

**शांतीलाल शर्मा**

**पालम,/प्रतिनिधी-** (वा) महा विद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागा मार्फत दि. १५ नोव्हेंबर रोजी सकाळी क्रांतिकारी बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख डॉ. बी.व्ही.शिंदे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एस.पी.बालाघाटे डॉ. घ.ना.पांचाळ डॉ.बी.एस. पवार,प्रा. ऋषी सातपुते आणि राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. कालिदास गुडदे यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे आणि आपल्या भाषणात बिरसा मुंडा यांच्या कार्याबद्दल माहिती दिली तसेच जल जंगल आणि जमीन हे शाश्वत विकासाचे सूत्र असून याचे संवर्धन करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. अध्यक्ष भाजपात बोलताना डॉ.बी.व्ह.शिंदे यांनी इंग्रजांविरुद्ध आदिवासी समाजाच्या हक्कासाठी त्यांनी लढा उभारला व समाजाला न्याय मिळवून दिला असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. कालिदास गुडदे यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बिहरी निवडणूकीत भाजपा विजयाबद्दल जिंतूरात आनंदोत्सव

**जिंतूर,/प्रतिनिधी-** आघाडीला ऐतिहासिक विजय मिळवून दिल्या बद्दल पालकमंत्री मेघना दीदी साकोरे बोर्डीकर, मा.आ. रामप्रसादजी बोर्डीकर साहेब व जिल्हाध्यक्ष सुरेशजी भुमरे साहेब यांच्या नेतृत्वाखाली आज जिंतूर येथे फटाके फोडून विजयी जल्लोष करण्यात आला.



यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष गोविंद थिटे पाटील, मा.जी.प.सभापती नानासाहेब राऊत, डॉ. पंडीत दराडे, ॲड.सुनील मते, गंगाधर अप्पा तरटे, आबासाहेब खेत्रे, विलास भंडारे, अशोक शिंपले, विठ्ठल रोकडे, श्याम पवार, मतीन तांबोळी, भास्करराव थिटे, सुयोग मुंढे, अखलाक काझी, रमेश मोहिते यांच्यासह अनेक भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. बिहार विकासाच्या, स्थैर्याच्या आणि राष्ट्रभक्तीच्या मार्गावर उभं राहिलं असून बिहारची जनता एनडीए सोबत आहे, हे आज बिहारच्या विजयातून सिद्ध झाले.

या विजयाबद्दल बिहारच्या जनतेचे मनःपूर्वक आभार. कर्मठ कार्यकर्त्यांची मेहनत, विजयी उमेदवारांचे अथक परिश्रम आणि सामान्य जनतेचा अटळ विश्वास यांच्या जोरावर आज बिहारमध्ये मोदीजींच्या नेतृत्वाखाली पुन्हा भगवा फडकला आहे.

### डॉ. रोडगे परभणी जिल्ह्यातील दुसरे एम.डी. रेडिओलॉजिस्ट; श्रीराम प्रतिष्ठानतर्फे गौरव

**सेलू,/प्रतिनिधी:** प्रिन्स इंग्लिश स्कूल, सेलू तसेच श्रीराम प्रतिष्ठानच्या सर्व संस्थांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. श्रीराम प्रतिष्ठानचे सदस्य व सॅनरो एज्युकेअर प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक डॉ. आदित्य भैया रोडगे यांनी छत्रपती संभाजीनगर येथील महात्मा गांधी मिशन वैद्यकीय महाविद्यालय ( ) येथे एम.डी. रेडिओलॉजीची पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण करून घवघवीत यश संपादन केले आहे. परभणी जिल्ह्यातून एम.डी. रेडिओलॉजिस्ट पदवी प्राप्त करणारे ते केवळ दुसरे डॉक्टर ठरले असून हा त्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीतील एक अत्यंत उल्लेखनीय टप्पा मानला जात आहे.



या उल्लेखनीय यशाबद्दल श्रीराम प्रतिष्ठानतर्फे प्रिन्स इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित कार्यक्रमात डॉ. आदित्य रोडगे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा सेलू कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती डॉ. संजय रोडगे, प्रशासकीय अधिकारी प्रा. महादेव साबळे, प्राचार्य डॉ. मीनाक्षी रत्नपारखी, प्रगती शिरसागर, प्रिन्स इंग्लिश स्कूल, डॉ. बबन सोनवणे, प्रा. अशोक बोडके, प्रा. अक्षय बन आदी मान्यवर उपस्थित होते. यांच्या हस्ते त्यांना पुष्पगुच्छ, शाल देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी भावना व्यक्त करताना डॉ. आदित्य रोडगे म्हणाले : ''एम.डी. रेडिओलॉजीची पदवी मिळणे हा माझ्या आयुष्यातील अतिशय महत्त्वाचा क्षण आहे. या प्रवासात अनेक आव्हाने आली, पण कुटुंबाचे प्रेम, मार्गदर्शकांचे पाठबळ आणि श्रीराम प्रतिष्ठानकडून मिळालेली निस्वार्थ साथ यामुळे मी हे स्वप्न पूर्ण करू शकलो. माझ्या प्रत्येक यशामागे माझे आईवडील, माझी बहीण डॉ अपूर्वा रोडगे पारवे, डॉ. गणेश पारवे माझे आजोबा तसेच मला जपणारे शिक्षक आहेतही भावना शब्दांत सांगणे कठीण आहे.'' ''ही पदवी माझ्यासाठी फक्त कौशल्याचा परवाना नाही, तर समाजाप्रती अधिक संवेदनशीलतेने सेवा करण्याची नवी जबाबदारी आहे. पुढील काळात ग्रामीण भागातील लोकांना उत्तम निदान सेवा उपलब्ध करून देण्यासाठी मी मनापासून प्रयत्न करणार आहे. ज्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला, त्या सर्वांचे मी सदैव ऋणी आहे.

### वसमत रस्त्यावरील वाहतूक कोंडीवर तातडीने उपाययोजना करा : भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा पोलिस अधीक्षकांना साकडं

**परभणी ,/प्रतिनिधी:** राष्ट्रीय वसमत रस्त्यासह खानापूर फाटा, चौक येथे सातत्याने वाढत नागरिक हैराण झाले आहेत. या आणून सामान्य नागरिकांना दिलासा जनता युवा मोर्चाचे नेते अभिषेक आणि रितेश शिंदे यांनी केली

या तिघांनी गुरुवारी जिल्हा यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे वाढत्या मांडली. शहरातील सर्वाधिक रस्त्यावर लांबपर्यंत विस्तारित




महामार्गाचा दर्जा प्राप्त असलेल्या काळी कमान व वसंतराव नाईक चाललेल्या वाहतूक कोंडीमुळे परिस्थितीवर तातडीने नियंत्रण द्यावा, अशी मागणी भारतीय वाकोडकर, रोहित उक्कडगांवकर आहे.

पोलिस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी वाहतूक कोंडीची गंभीर समस्या वर्दळीचा मार्ग असलेल्या वसमत वसाहती, विविध शासकीय कार्यालये, शिक्षण संस्था, रुग्णालये, व्यावसायिक प्रतिष्ठाने, देवस्थाने व हॉटेल्स असल्याने दिवसाचे जवळपास १८ तास येथे वाहतुकीची प्रचंड गर्दी असते.

विशेषतः खानापूर फाटा हा टी-पॉईंट असल्याने वसमत, नांदेड, पूर्णा आणि परभणी दिशेने येणाऱ्या वाहनांची एकत्रित मागणी वाढून सकाळी ९ ते १२ आणि सायंकाळी ५ ते ९ या गर्दीच्या वेळेत वाहतूक पूर्णपणे ठप्प स्थितीत येते आहे. त्यामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागणे, पादचारी व विद्यार्थ्यांना धोका निर्माण होणे, तसेच लहानमोठे अपघात व वाद-विवाद होण्याच्या घटना वाढल्या असल्याचे निवेदनात नमूद केले.

वाहतूक कोंडीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभाग क्र. १५ अंतर्गत वसमत रोडवरील खानापूर फाटा, विद्यापीठ गेट (काळी कमान) आणि वसंतराव नाईक चौक येथे शहर वाहतूक पोलिस चौकी उभारण्यात यावी, तसेच योग्य मनुष्यबळ तैनात करून वाहतूक सुरळीत करण्याच्या तातडीच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी युवा मोर्चाच्या प्रतिनिधींनी जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे केली आहे.

### नगरअध्यक्ष पदासाठी ५ तर नगरसेवक पदासाठी ४२ उमेदवारी अर्ज दाखल

**पूर्णा,/प्रतिनिधी-** पूर्णा नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकसाठी शनिवार रोजी नगरसेवक पदासाठी ३६ तर अध्यक्षपदासाठी ४ उमेदवारी अर्ज दाखल झाले असून आज पर्यंत अध्यक्षपदासाठी ५ तर नगरसेवक पदासाठी ४२ उमेदवारी अर्ज दाखल झाले असल्याची माहिती निवडणूक निर्वाचन अधिकारी तथा तहसीलदार माधवराव बोथीकर यांनी सांगितले. पूर्णा नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया दिनांक १० नोव्हेंबर सोमवारपासून पूर्णा तहसील कार्यालयात सुरू आहे शनिवारी नगरसेवक पदासाठी ३६ उमेदवारी अर्ज तर नगराध्यक्ष पदासाठी ४ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहे आता उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी केवळ दोन दिवस शिल्लक राहिले असून रविवारी सुद्धा उमेदवारी अर्ज घेण्याची प्रक्रिया सुरू राहणार असल्याची माहिती निर्वाचन अधिकारी बोथीकर यांनी सांगितली. येणाऱ्या दोन दिवसात मोठ्या प्रमाणात उमेदवारी अर्ज दाखल होण्याची शक्यता आहे राहिलेल्या दोन दिवसात ऑफलाइन पद्धतीने सुद्धा उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. शनिवार पर्यंत अध्यक्षपदासाठी मुख्य राजकीय पक्षांचे उमेदवारी अर्ज दाखल झाले नव्हते त्यामुळे त्यामुळे येणाऱ्या दोन दिवसात उमेदवारी अर्ज दाखल होणार आहेत.सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

### आज सेलूत अक्षर साहित्य संमेलन ; कुलकर्णी उद्घाटक तर भालेराव यांच्या उपस्थितीत समारोप

**सेलू,/प्रतिनिधी-** येथील अक्षर प्रतिष्ठानच्या वतीने मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या सहकार्याने जिल्हास्तरीय पहिले अक्षर साहित्य संमेलन रविवार ( दि. १६ ) रोजी शहरातील साई नाट्य मंदिर येथे आयोजित करण्यात आले आहे. साहित्य संमेलनाचे उद्घाटन चित्रपट व नाट्य दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी यांच्या हस्ते होणार आहे. तर समारोप प्रसिद्ध कवी इंद्रजित भालेराव यांच्या उपस्थितीत होईल. सकाळी सात वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून ते साई नाट्य मंदिरापर्यंत ग्रंथ दिंडी निघणार आहे. साई नाट्य मंदिरात उद्घाटन, परिसंवाद, कथाकथन, निमंत्रितांचे कवी संमेलन, कै. कमलबाई बाहेती सभागृह, नूतन कन्या प्रशालेत बालकट्टा, नूतन विद्यालयाच्या कै. रा.ब.गिल्डा सभागृहात परभणीचे अंतरंग - निमंत्रित कवींची दोन कवी संमेलन व गझल मुशायरा, नूतन विद्यालय कर्मचारी पत संस्था सभागृहात कवी कट्टा होणार आहे. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त साहित्यिक आसाराम लोमटे हे संमेलनाचे अध्यक्ष आहेत. अक्षर साहित्य संमेलनास पालकमंत्री मेघना दिदी बोर्डीकर साकोरे, मराठवाडा साहित्य परिषद, छत्रपती संभाजी नगरचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईचे सदस्य डॉ. मार्तंड कुलकर्णी ( किनवट ), प्रकाश होळकर ( नाशिक ), डॉ. राजेश गायकवाड ( परभणी ), बालरंगभूमी, मुंबई च्या अध्यक्ष ॲड. निलम शिर्के, कथाकार विलास सिंदगिकर, प्रा. यादवराव गायकवाड, डॉ. रामचंद्र काळुंखे, डॉ.कैलास अंभुरे, डॉ. गणेश मोहिते, एकनाथ आव्हाड,डॉ.मारोती कसाब, केशव बा. वसेकर, प्रा. रवीशंकर झिंगरे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. अक्षर साहित्य संमेलनास उपस्थित राहावे असे आवाहन प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर, सर्जेराव लहाने, प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, डॉ.सुरेश हिवाळे, डॉ. शरद ठाकर आणि संयोजकांनी केले आहे.

बालदिनाचा आनंदोत्सव : जिल्हाधिकाऱ्यांसोबत मुलांची अविस्मरणीय सहल : बालगृहातील मुलांचा खास बालदिन : स्वतः जिल्हाधिकारी यांनी मुलांना घडविली बैलगाडीतुन सफर

परभणी दि. १४ बालदिनानिमित्ताने महिला व बालविकास विभागाच्यावतीने बालगृहातील मुलांसाठी आज धर्मपुरी येथील श्री राम बाग येथे एकदिवसीय सहलीचे आयोजन करण्यात आले. या सहलीमुळे बालगृहातील मुलांना आनंद, उत्साह आणि अप्रतिम अनुभव लाभला.यावेळी स्वतः जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी बैलगाडी हाकली व मुलांना फेरी मारून आणली. तसेच त्यांनी मुलांसोबत गाणी गायली, गप्पा मारल्या आणि प्रेमाने बालदिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. मुलांशी मैत्रीपूर्ण नातं जुळवून त्यांच्यात मिसळण्याची त्यांची शैली सर्वांना भावली. उपस्थित अधिकारी-कर्मचारी वर्गानेही मुलांना बालदिनाच्या शुभेच्छा देऊन त्यांच्या चेहऱ्यावर हसू उमटवले. मुलांनी सहलीचा मनसोक्त आनंद घेतला, विविध खेळांचा, नैसर्गिक सौंदर्याचा व सहलीतील उपक्रमांचा आनंद लुटला. तसेच मुलांना या अनुभवावर निबंध लिहिण्याचे प्रोत्साहन देण्यात आले, ज्यामुळे त्यांच्या अभिव्यक्तीक्षमता आणि सृजनशीलतेला चालना मिळणार आहे. एकूणच, परभणी जिल्ह्यातील या उपक्रमाने बालदिनाचा खरा अर्थ उजळला. बालपणाचा आनंद, मोकळेपणा आणि निरागसता पुन्हा अनुभवणे. सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये हा बालदिन हसतमुख, आनंददायी आणि संस्मरणीय वातावरणात साजरा झाला. प्रारंभी जिल्हाधिकारी महोदयांच्या उपस्थितीत मुलांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हा महिला व बालविकास अधिकारी मोनिका रंधवे, बालविकास प्रकल्प अधिकारी मिलिंद वाघमारे, ओबीसी महामंडळाचे संचालक रामेश्वर मुंढे, बालकल्याण समिती अध्यक्ष रवींद्र कातनेश्वरकर, बालकल्याण समितीचे सर्व सदस्य, जिल्हा परिविक्षा अधिकारी, महिला विकास व बालविकास विभागातील अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाइल्ड हेल्पलाइनचे कर्मचारी, संरक्षण अधिकारी तसेच बालगृह अधीक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com

# नांदेडात 'खून का बदला खून'

## ग्रामीण पोलीसांनी तीन तासात केली आरोपींना अटक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ नोव्हेंबर-**

शहरापासून जवळच असलेल्या बळीरामपुर येथे खुन का बदला खुन अशा पध्दतीची घटना घडली असून वडीलांच्या खुन प्रकरणातील आरोपीला ठार करण्यात आले आहे. या प्रकरणात ग्रामीण पोलीसांनी खुनाच्या घटनेचा उलगडा अवघ्या तीन तासात करून तीन आरोपींना अटक केली आहे.



शहरापासून जवळच असलेल्या बळीरामपूर येथे राष्ट्रपाल तुकाराम कपाळे हा पंचशिल नगर येथील किरणा दुकान सांभाळत बसला होता. दि. १४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास त्याचा खंजरने भोसकुन खुन करण्यात आला. याप्रकरणी कस्तुराबाई कपाळे यांच्या फिर्यादीवरून सुरूवातीला अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी वेगवेगळी पाच पथके तयार करून अज्ञात आरोपीचा शोध घेतला असता मैयताचा गुन्हेगारी रेकॉर्ड चेक केल्यानंतर मैताने जवळपास १७ वर्षापुर्वी राजु गवळे याचा खुन केला होता. हा खुन देखिल पुर्व वैमनस्यातून झाला असल्याचा संष्य आल्याने पोलीसांनी राजु गवळे याचा मुलगा नागेश गवळे याचा शोध घेवून त्याची विचार पुस केली असता त्याने व त्याचे मित्र अभिजीत गजभारे रा. धनेगाव व लक्की पारके रा. गौतमनगर यांनी मिळून राष्ट्रपाल कपाळे याचा खुन केल्याची कबुली दिली. पोलीसांनी या प्रकरणातील तीन ही आरोपींना अटक केले असून त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेले मोटरसायकल जप्त केली आहे.

## भोकर शहरात राहून जनतेचे प्रश्न सोडवणारा नगराध्यक्ष हवा

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. १५ नोव्हेंबर-**

अनेकांनी नांदेडला राहून भोकर नगरपरिषदेचा नगरसेवक नगराध्यक्ष होण्याची स्वप्ने पाहत आहेत येथील मतदार अशा लोकांना नगरपरिषदेत पाठवतील का?असा प्रश्न नागरीकांना पडला असून भोकर शहरात राहणारा जनतेची कामे करणारा नगराध्यक्ष व नगरसेवकास आम्ही निवडणार असल्याचे मतदार बोलत आहेत.भोकर नगरपरिषदेच्या निवडणूकिसाठी अनेकजण गूडघ्याला बाशिंग बांधून फिरताना दिसून येत आहेत फिक्स नगराध्यक्ष,फिक्स नगरसेवक आशा पोस्ट समाज माध्यमावर झळकत आहेत मागील काळात कोणत्या नगरसेवकांनी जनतेची कामे केली कूणाचे प्रश्न सोडविले यापूढे आपली कामे कोण करु शकतो हे देखील मतदार ओळखून आहेत अडचणीच्या काळात ह्या लोकांनी निवडून दिलेल्या नगरसेवकास फोन केला तर त्यांचा कधी फोन उचलला नाही त्यांची अडचण समजून घेतली नाही अशा लोंकांनी पून्हा नगरसेवक नगराध्यक्ष होण्याचे स्वप्न पाहत असल्याचे निदर्शनास येत असून मतदारांनी यावेळी जो नगरसेवक पूर्ण वेळ भोकरला राहून जनतेची कामे पाहतील अशा उमेदवारांच्या पाठिशी खंबिरपणे साथ देण्याचा व त्यांना प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळवून देण्याचा प्रयत्न करणार असल्याची चर्चा मतदारामध्ये होत आहे.पक्षश्रेष्ठिनी उमेदवार देताना या सर्व बाबींचा विचार करुन प्रभागात राहणारा सामाजीक भान असलेला उच्चशिक्षित उमेदवार दिल्यास निश्चित मतदारांनी अशा उमेदवारांना साथ देतील अशी चर्चा वार्डा वार्डातील नागरीकांमध्ये होत आहे.

## श्रीनिकेतन शाळेत बालक दिन उत्साहात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ नोव्हेंबर-**

दीपक नगर तरोडा बुद्रुक भागातील श्रीनिकेतन प्राथमिक शाळेत देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीदिनी शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ.सौ.एस.एन राऊत यांच्या अध्यक्षतेखाली बालक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थी गणेश वाघमारे, मंजू देशमुख, रसिका कुरूडे, श्रेया कांबळे, तनवी रणवीर, माही केदारे, प्रतीक गायकवाड, रोहन गजभारे, हर्षद कीर्तने, भक्ती उट्टीलवाड यांना मुख्याध्यापिका डॉ.सौ.राऊत यांच्या हस्ते मेडल देऊन गौरवण्यात आले.

## माहूर शहरासह तालुक्यात भगवान बिरसा मुंडा जयंती उत्साहात साजरी



**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १५ नोव्हेंबर-**

भारत सरकारने १५ नोव्हेंबर हा दिवस जनजाती गौरव दिवस म्हणून घोषित केला असून,आदिवासी समाजाकडून ज्यांना 'भगवान' आणि 'धरती अब्बा' म्हणून पूजले जाते असे एक महान आदिवासी क्रांतिकारक, स्वातंत्र्यसैनिक आणि सामाजिक सुधारक भगवान बिरसा मुंडा यांची जयंती माहूर शहरासह तालुक्यात ठिकठिकाणी विविध सामाजिक उपक्रम व प्रबोधनात्मक कार्यक्रमाच्या आयोजनातून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा यांची जयंती आदिवासी सामाज संघटनेसह विविध सामाजिक व युवक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने माहूर येथे आज दि. शनिवार १५ नोव्हेंबर रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.शहरातील भगवान बिरसा मुंडा चौकात हुतात्मा बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेपुढे दीपप्रज्वलन करुन प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या संघर्षमय आयुष्याचे व बलिदानाचे स्मरण करण्यात आले.स्थानिक आदिवासी समाज, विद्यार्थी संघटना, स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट तसेच नगरातील विविध सामाजिक मंडळांनी रॅली, सांस्कृतिक कार्यक्रम व परंपरागत नृत्यांच्या माध्यमातून आदिवासी क्रांतीवीर भगवान बिरसा मुंडा यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थित वक्त्यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकताना सांगितले कि, भगवान बिरसा मुंडा यांची जयंती १५ नोव्हेंबर रोजी साजरी केली जाते, कारण त्यांचा जन्म याच दिवशी १८७५ साली झारखंडमधील उलिहातू येथे झाला होता. ते एक महान आदिवासी क्रांतिकारक, स्वातंत्र्यसैनिक आणि सामाजिक सुधारक होते, ज्यांनी ब्रिटिश आणि मिशनऱ्यांच्या विरोधात मोठा संघर्ष केला. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी, केंद्र सरकारने १५ नोव्हेंबरला 'जनजाती गौरव दिवस' म्हणून घोषित केले आहे. भगवान बिरसा मुंडा यांनीब्रिटिश आणि मिशनरी यांच्या धर्मांतराच्या प्रयत्नांविरुद्ध लढा दिला.'उलगुलन' (महान उठाव) नावाच्या चळवळीचे नेतृत्व केले, ज्याने ब्रिटिश सत्तेला आव्हान दिले.आदिवासींच्या जमिनी परत मिळवण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी संघर्ष केला.आदिवासी समाजाकडून त्यांना 'भगवान' आणि 'धरती अब्बा' (पृथ्वीचे पिता) म्हणून पूजले जाते, असे गौरवगाण केले.

यावेळी मुलामुलींसाठी इतिहास व आदिवासी संस्कृतीवर आधारित प्रश्नमंजुषा, चित्रकला स्पर्धा, तसेच पारंपारिक वाद्यवृंदाचा आकर्षक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी बिरसा मुंडा यांचे विचार अनुसरण्याचा संकल्प केला.माहूर शहरासह तालुक्यात ठिकठिकाणी क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा यांची जयंती विविध सामाजिक उपक्रम व प्रबोधनात्मक कार्यक्रमाच्या आयोजनातून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

### अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या वाढदिवसाचे कार्यक्रम रद्द

**नांदेड-** यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून सामान्य नागरिकही हैराण झाले आहेत त्यामुळे शेतकरी आणि नागरिकांच्या या नैसर्गिक संकटाच्या दुःखात सहभागी होत खा. डॉ. अजित गोपछडे यांनी आपल्या वाढदिवसाचे सर्व कार्यक्रम रद्द केले आहेत अशी माहिती त्यांच्या संपर्क कार्यालयातून देण्यात आली आहे.



खा. डॉ. अजित गोपछडे यांचा वाढदिवस दिनांक १९ नोव्हेंबर रोजी असून दर वर्षी वाढदिवसानिमित विविध उपक्रम आणि कार्यक्रम आयोजित केले जातात. मात्र यावर्षी मे महिन्यापासून जिल्ह्यात सतत पाऊस सुरू आहे. अतिवृष्टीमुळे लाखो हेक्टर वरील पिके पाण्याखाली गेली आहेत. शेतकरी हैराण झाला आहे. शेतमुजारांच्या हाताला काम उरले नाही अशी परिस्थिती असताना आपला वाढदिवस साजरा करणे उचित नाही. आपण सामान्य शेतकरी , शेतमजूर यांच्या संवेदनांशी एकरूप असणारे लोकप्रतिनिधी आहोत त्यामुळे यावर्षी वाढदिवसाचे सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत असे त्यांनी सांगितले. त्यामुळे चाहत्यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने कुणीही हार - तुरे , मिठाई , केक , पुष्पगुच्छ आणू नयेत शक्य झालेच तर वंचिताना , गोरगरिबाना मदत करावी असे आवाहन करण्यात आले आहे. खा. डॉ.अजित गोपछडे यांनी स्वतः आवाहन केले की, वाढदिवसाच्या दिवशी मी कुटुंबासह देवदर्शनाला जाणार आहे.आपला सर्वांचा स्नेह, आणि सहकार्य कायमआहे, ते अधिक वृद्धिंगत व्हावे ही सदिच्छा!असल्याची भावना खा. डॉ. अजित गोपछडे यांनी व्यक्त केली आहे.

## महिला साहित्यीकांचा सन्मानासह वृत्तपत्र क्षेत्रातील बांधवांना मोफत विमा पॉलीसी बहाल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ नोव्हेंबर-**

कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून नावलौकीक मिळवणाऱ्या सर्व गुण संपन्न तथा हरहुन्नरी व्यक्तिमत्व अशी ख्याती असाणाऱ्या स्व. सरोजताई देशपांडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पुरस्कार प्राप्त व नामवंत महिला साहित्यीकांचा विशेष सन्मानासह वृत्तपत्र क्षेत्रातील बांधवांना ३ लाख रुपयांची मोफत विमा पॉलीसी दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी मान्यवरांच्या हस्ते बहाल करण्यात आली असल्याची माहिती मुख्य संयोजक तथा मुख्य संपादक रुपेश पाडमुख यांनी एका प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळवले आहे.

मीमांसा फाऊंडेशन, दै.समीक्षा, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मंथन क्रिएटिव्ह ग्रुप व पत्रकार प्रेस परिषदेच्यावतीने दरवर्षी विविध क्षेत्रातील मान्यवरांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येत असतो. साधारण १८ वर्षापासून हा उपक्रम सुरु आहे. सदरील पुरस्कार सोहळ्याला अपेक्षा हॉस्पीटलचे संचालक डॉ. संजय पतंगे, फिजिओथेरेपीस्ट डॉ.राजेंद्र पाटील, सौ.योगीनी सातारकर, ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेता लक्ष्मीकांत पवार तथा मानवतचे ज्येष्ठ संपादक आश्रोबा केदारे आदी मान्यवरांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती.

यावेळी शासनाचा पुरस्कार मिळवणाऱ्या प्रसिद्ध लेखिका सौ. स्वाती कान्हेगावकर यांचा त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल सन्मान करण्यात येणार आहे. मागील दहा वर्षापेक्षा अधिक काळापासून अनेक कविता संग्रह प्रकाशीत केलेल्या सौ.छाया बेले, कविता संग्रह, कथा संग्रहासह अनेक पुरस्कार प्राप्त बालिका बरगळ वसमतकर, ललीत लेखनासह प्रासंगिक लेखन करणाऱ्या सौ.रोहिणी पांडे, अनेक वर्षापासून लेखनातून नावलौकीक मिळवलेल्या, सौ.योगीनी सातारकर, श्री विश्वदेव आयुर्वेद चिकित्साल येथे आयुर्वेद डॉक्टर म्हणून कार्यरत डॉ. स्वाती भद्रे आमुसकर, मागील २२ वर्षापासून मतीमंद विद्यार्थ्यासाठी सेवा देणाऱ्या डॉ.मनीषा तिवारी, हिंदी-उर्दु व मराठी भाषांवर प्रभुत्व ठेवत आपल्या लिखानातून अनेक पुरस्कार मिळविलेल्या डॉ. शेख शेहनाज अहेमद, कविता, चारोळी, कथा, अभंग अशा विविध लिखाणातून नामांकित झालेल्या सौ. रुपाली वागरे, नवोदीत लेखिका म्हणून उदयास येत असलेल्या डॉ.अश्विनी भोरे, सगळ्यात वेगळे उदाहरण म्हणून सौ.गोदावरी गायकवाड व ज्योती गायकवाड, एकांकीका कविता संग्रह व कथा संग्रह प्रकाशित करणाऱ्या सौ.अनिता जाधव यांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्याच बरोबर वृत्तपत्र क्षेत्रातील बांधवांना ३ लाख रुपयांची मोफत विमा पॉलीसी प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्व. सरोजताई देशपांडे यांच्या प्रतिमेचे पुजन करुन आदरांजली वाहण्यात आली. लातूरचे संपादक रामेश्वर धुमाळ, उत्तरचे अध्यक्ष निळकंठ मदने, परभणी जिल्हाध्यक्ष रमेश नाटकर, हिंगोली जिल्हाध्यक्ष आय.डी.पठाण, संपादक अयुब्ब पठाण, प्रदेश सचिव दत्ताजी मोहिते, महानगराध्यक्ष रमेश देवडे, उपाध्यक्ष प्रा.अमृत जाधव, शिवहरी गाढे, अर्धापूर तालुकाध्यक्ष उध्दवराव सरोदे यांनी मान्यवर पाहुण्यांचा सत्कार केला. प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन करुन प्रोत्साहित केले. शासनाचा पुरस्कार प्राप्त लेखिका सौ. स्वाती कान्हेगावकर यांनीही मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंथन क्रिएटिव्ह ग्रुपचे रामेश्वर धुमाळ, सुरेख सुत्रसंचालन सौ.सुवर्णा कळसे यांनी केले तर आभार मुख्य संयोजक तथा मुख्य संपादक रुपेश पाडमुख यांनी मानले.

### पंचशील विद्यालयात भगवान बिरसा मुंडा जयंती साजरी



**हदगाव** -शहरातील पंचशील माध्य व उच्च माध्य विद्यालयात भगवान बिरसा मुंडा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक गोपाळ बंड्रेवार,पर्यवेक्षक अनिल दस्तूरकर परीक्षा प्रमुख अरविंद जाधव सह सर्व शिक्षकांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी सुंदर आदिवासी नृत्याचे सादरीकरण केले.निबंध स्पर्धा,चित्रकला स्पर्धा व भाषणात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सांस्कृतिक विभाग प्रमुख जनार्दन देशमुख यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या कार्याचा आढावा घेत त्यांच्या विषयी सविस्तर माहिती दिली. शाळेचे मुख्याध्यापक गोपाळरेड्डी बंड्रेवार हे किनवट तालुक्यातील असल्याने त्यांनी आदिवासी भाषाशैलीत श्रावण बाळ तसेच रामायणा तिल प्रसंग सांगून त्याचा मराठीत अर्थ सांगितला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती दर्शना सोनटक्के,श्रीमती पुजा जंगवाड यांनी परिश्रम घेतले. भगवान बिरसा मुंडा यांच्या कार्यचा आढावा घेत कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन श्रीमती सारीका बारसे यांनी केले.

### आज रविवार सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्रे भरता येणार

**नांदेड** -नगर परिषद, नगर पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकांचा ४ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिध्दी केलेल्या कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्रे संगणक प्रणाली द्वारे ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येत आहेत. परंतु संगणक प्रणालीमध्ये स्विकारण्यात येणाऱ्या नामनिर्देशन पत्र भरण्यासाठी अडचणी येत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे तसेच नामनिर्देशन पत्रे सादर करण्यासाठी शेवटचे दोन दिवस शिल्लक राहीले आहेत, अशा परिस्थितीत संगणक प्रणालीवरील भार येण्याची शक्यता लक्षात घेता आणि उमेदवारांना समान संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून राज्य निवडणूक आयोगाने पुढीलप्रमाणे निर्देश दिले आहेत. दिनांक १५ ते १७ नोव्हेंबर २०२५ या कालावधीमध्ये तीनही दिवस (रविवार १६ नोव्हेंबर २०२५) या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीसुध्दा दररोज सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारांना दोन्ही पध्दतीने म्हणजेच संकेतस्थळ (ऑनलाईन) तसेच पारंपारिक (ऑफलाइन) पद्धतीने सुद्धा नामनिर्देशन पत्रे आवश्यक कागदपत्रांसह संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करता येतील, असे नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सह आयुक्त गंगाधर इरलोड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविली आहे.

### कलावतीबाई पंदलवाड निधन...

**हिमायतनगर** - तालुक्यातील धानोरा येथील रहिवासी ज्येष्ठ नागरिक कलावतीबाई शंकर पंदलवाड यांचे गुरूवारी दि १३ नोव्हेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्या ८५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात ३ मुले, मुलगी, नातू, पणतू असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी दि.१४ रोजी सकाळी १ वाजता धानोरा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.पत्रकार ॲड. ज्ञानेश्वर पंदलवाड यांच्या मातोश्री होत्या.

## नरसी सर्कलमध्ये तोटरे यांच्या जनसंवादाला उस्फूर्त प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. १५ नोव्हेंबर-**

जिल्हा परिषद निवडणुकीचा तापमान वाढू लागल्याने नरसी सर्कलमध्ये राजकीय समीकरणांची लगबग चांगलीच वाढली आहे. अनुसूचित जातीसाठी महीला राखीव असलेल्या या सर्कलमध्ये भाजपचे प्रा. मनोहर तोटरे यांनी आपल्या सौभाग्यवती सौ. तृष्णा मनोहर तोटरे यांना उमेदवारी द्यावी, अशी अधिकृत इच्छा व्यक्त होताच सगळा सर्कल राजकीय चर्चांनी गजबजला आहे.

त्यानंतर तोटरे दाम्पत्याने सुरू केलेल्या 'जनसंवाद' अभियानाने तर अक्षरशः गावागावांत धुमाकूळ घातला आहे. धानोरा, शेळगाव, कुंचेली, भोपाळा, मुगाव, कांडाळा ते नरसी प्रत्येक ठिकाणी झालेल्या छोट्यामोठ्या सभांना नागरिकांचा मोठा प्रतिसाद पाहायला मिळत आहे.



सभांमध्ये स्थानिक प्रश्न, प्रलंबित विकासकामे आणि पक्षाच्या धोरणांची थेट मांडणी करताना तोटरे यांना जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळत असून,

सर्कलला सक्षम नेतृत्व हवं, विकासाकडे नेणारं नेतृत्व हवं, आणि तोटरेच त्या पात्रतेचे, अशा प्रतिक्रिया मतदारांतून ऐकू येत आहेत.

या दौऱ्यात आनंदराव पाटील बावणे, अवकाश पाटील धुपेकर, धम्मदीप भद्रे, रमाकांत सूर्यवंशी, सिद्धार्थ भेदे, परमेश्वर पाटील जाधव,माधव पाटील घाटोळे, सुधाकर पाटील, नागोराव शिपाळे, प्रा. समदानी सय्यद, माणिक पाटील घाटोळे, नरसिंग पाटील, वाढवणे, भारत अप्पा मेडाबलमेवार, हणमंत वाघमारे, शिवाजी वाघमारे, कोंडीबा इंगळे, पांढरे पाटील आदींच्या उपस्थितीने तोटरे दाम्पत्याचा दौरा आणखी रंगला. तोटरे यांच्या उमेदवारीसाठी गावोगावी होत असलेली एकमुखी मागणी, गर्दी पाहता स्थानिक राजकीय समीकरणे या सर्वांचा विचार केला असता नरसी सर्कलमध्ये भाजपची स्थिती सध्या मजबूत दिसत आहे.



**देगलूर- शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ आदीं ठिकाणी मोकाट जनावरांचा संचार वाढल्याने वाहतूकीस अडथळा निर्माण होत आहे. मोकाट जनावरांमुळे विविध अपघाताच्या घटना घडल्या असून या समस्येकडे नगरपरिषदेने तात्काळ लक्ष द्यावे, असे नागरिक आणि वाहनधारकांची मागणी जोर धरत आहे.**

## आ. चिखलीकर यांच्या उपस्थितीत देगलूर मधील अनेक कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी प्रवेश

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ नोव्हेंबर-**

नगरपरिषद निवडणुकीच्या धामधुमीत राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये पक्षप्रवेश सोहळे सुरू आहेत. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत देगलूर येथील असंख्य कार्यकर्त्यांनी आज आ. चिखलीकर यांच्या साई सुभाष या संपर्क कार्यालयात राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये जाहीर रित्या प्रवेश केला आहे.

आज साई सुभाष जनसंपर्क कार्यालय वसंतनगर नांदेड येथे देगलूर तालुक्यातील संजय नागोराव लोखंडे ,गंगाधार मारोती बोयावार,कलीम मैनोदीन शेख ,शेख हैदर इब्राहिम,शिवराज भिमराव बोयावार, हैदर चांदसाब शेख, देविदास दत्ता काकेवार, राजेश गोविंदराव कोकणे, भगवानराव इरवंतराव पाटील, प्रकाश विठ्ठलराव पाटील, मारोती नागनाथ परबते, सुरेश मल्लू येन्नलवार, यशवंत गोविंदराव राजुरे, शंकर विश्वनाथ आगलावे, माधव एकनाथराव इंगळे, शिवराज शंकराव कोनेरे, हणमंत नागोराव इंगळे, भारत पुंडलिक मुरगे, वसंत लक्ष्मण येन्नलवार, हणमंत बसवंत येन्नलवार, दिंगाबर अशोक बकन्नवार, गोविंद नागनाथ लाळे, हणमंत गंगाधर कोनेरे, शंकर हणमंत लाळे, भास्कर गणपत घरडे,हणमंराव आगलावे, त्रिमुर्ती दत्तात्रय पांचाळ, कृष्णा मचिंद्र केरले,पंढरी तुळशिराम इंगळे,माधवराव संभाजीराव विभुते, शंकर माधवराव विभुते, शेफिक उमर साहब,अशिफ हाजि साहब धनजकर, लतीफ मीया साहब, कपिल शंकरराव विभु , गजानन बाबुराव हेंन्टे, माधवराव गंगाराम विभुते, शिवाजी माधवराव इंगळे, यादवराव नागनाथ इंगळे, वसंत पुंडलीक खुशोबा, देविदास बापुराव राजूरे, दिलिप कोंडीबा वाघमारे, बळीराम रामा वाघमारे, शिवा वसंत विभुते, शंकर लक्ष्मण दुडलवार, बालाजी माधवराव भंडारे, दत्ता पांचाळ, शंकर मैलापुरे, शिदराम यन्नलवार, मारोती शिवा कैकाडी, बजरंग मेंडकर यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीमध्ये प्रवेश केला.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी यावेळी पक्षप्रवेश केलेल्यांचे स्वागत करत पक्ष वाढीसाठी तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी दिलीपराव धर्माधिकारी, उदय चव्हाण, अंकुश देसाई, शिवाजीराव कणकट्टे, यादवराव देसाई, बालाजीराव शिंदे, राहुल देसाई, मंगल देसाई, गजानन पाटील, बालाजीराव भूतणारे, माधवराव पाटील , मोहित पाटील सुगावकर ,सूर्यवंशी साहेब यशवंत पाटील , यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.